● पंढरपूर ● रविवार, २२ डिसेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com   RNI-MAH-MAR/1499/2000   ● वर्ष २९ ● अंक - २१२





सांगोला सायकलर्स क्लबचा निसर्ग संवर्धनचा उपक्रम PII





जागतिक किर्तीच्या सवाई महोत्सवात ज्ञानेश्वर दुधाणे यांची पखवाज सेवा PIII


# काळाचा घाला !

## कंटेनर कारवर उलटला; कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**सांगली :** बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर कंटेनर ट्रक उलटून भीषण अपघात झाला आहे. या अपघातात एकाच कुटुंबातल्या सहा जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समजते. अपघातात मृत्यू झालेलं कुटुंब हे सांगलीच्या जत तालुक्यातलं आहे. ख्रिसमसच्या सुट्टीनिमित्त कुटुंबिय बंगळुरूहून जतला गावी येत होते. त्यावेळी कंटेनर ट्रक कारवर उलटला. यात ६ जण मृत्यूमुखी पडले. नाताळच्या सुट्टीसाठी गावी येत असलेल्या सांगलीतील एका कुटूंबावर काळाने घाला घातला. कर्नाटक राज्यातील नेलमंगळा येथे शनिवारी एक कंटेनर ट्रक कारवर पलटल्याने एकाच कुटुंबातील ६ जणांचा जागीच मृत्यू झाला. मृत सांगली जिल्ह्यातील जतमधील असल्याचे माहिती आहे. या घटनेने जत तालुक्यावर शोककळा पसरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना बेंगळुरुजवळ तळकेरे येथे घडली. एक कंटेनर ट्रक कारवर पलटला. कारमध्ये ६ व्यक्ती बसले होते. अपघातामुळे राष्ट्रीय महामार्ग- ४८ वरील वाहतूक विस्कळीत झाली होती.



सांगलीमधील जत तालुक्यातील मोरबगी गावातील लोक बेंगळूरुला कामाला आहेत. नाताळच्या सुट्टीनिमित्त बेंगळुरूवरून आपल्या गावी परतत असताना हा भीषण अपघात झाला. कारमध्ये ६ जण होते ते जतमधील आपल्या गावाकडे येत होते. मात्र गावी पोहोचण्याआधीच काळाने त्यांच्यावर घाला घातला. तळकेरे येथे आल्यानंतर समोरून येणारा कंटेनर ट्रक कारवर पलटी झाली. या घटनेत कारमधील सर्व जणांचा मृत्यू झाला. सर्वजण एकाच कुटुंबातील असल्याचे सांगितले जात आहे.


» पान ३ वर


# रशियाच्या कझानमध्ये 9/11 ची पुनरावृत्ती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रशियातील कझान शहरात शनिवारी सकाळी अमेरिकेतील ९/११ सारखा हल्ला झाला. वृत्तसंस्था रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, युक्रेनने कझानमध्ये 8 ड्रोन हल्ले केले, त्यापैकी 6 निवासी इमारतींवर झाले. हा हल्ला मॉस्कोपासून 800 किलोमीटर अंतरावर झाला. आतापर्यंत या हल्ल्यात कोणीही मारले गेल्याचे वृत्त नाही.

या हल्ल्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये अनेक ड्रोन इमारतींवर आदळताना दिसत आहेत. या हल्ल्यांनंतर रशियाचे दोन विमानतळ बंद करण्यात आले आहेत.

2001 मध्ये अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवाद्यांनी अशाच पद्धतीने 4 विमानांचे अपहरण केले होते. यापैकी 3 विमाने अमेरिकेतील 3 महत्त्वाच्या इमारतींवर एकामागून एक कोसळली. पहिला अपघात रात्री 8:45 वाजता झाला. बोईंग 767 हे विमान वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या नॉर्थ टॉवरवर वेगाने आदळले. 18 मिनिटांनंतर, दुसरे बोईंग 767 इमारतीच्या दक्षिण टॉवरवर आदळले. 4 महिन्यांपूर्वी रशियावर असाच हल्ला झाला होता. युक्रेनने रशियातील सेराटोव्ह शहरातील व्होल्गा स्काय या 38 मजली निवासी इमारतीला लक्ष्य केले होते. रशियाचा स्ट्रॅटेजिक बॉम्बर लष्करी तळही येथे आहे. या हल्ल्यात 4 जण जखमी झाले आहेत. यानंतर रशियाने प्रत्युत्तर देत युक्रेनवर 100 मिसाईल आणि 100 ड्रोन डागले. यात सहा जणांचा मृत्यू झाला असून दीडशेहून अधिक जण जखमी झाले आहेत.

रशियाच्या आण्विक प्रमुखाची 4 दिवसांपूर्वी हत्या करण्यात आली होती- अवघ्या चार दिवसांपूर्वी रशियाचे अण्वस्त्र प्रमुख इगोर किरिलोव्ह यांचा मंगळवारी मॉस्कोमध्ये झालेल्या स्फोटात मृत्यू झाला. हल्ल्याच्या वेळी, किरिलोव्ह अपार्टमेंटमधून बाहेर पडत असताना जवळ उभ्या असलेल्या स्कूटरचा स्फोट झाला. यामध्ये किरिलोव्हसोबत त्यांचा सहाय्यकही मारला गेला.

वृत्तसंस्था रॉयटर्सने युक्रेनच्या अधिकाऱ्यांच्या हवाल्याने म्हटले होते की, किरिलोव्हची हत्या युक्रेननेच केली होती. मीडिया रिपोर्ट्सनुसार, युक्रेनच्या सिक्युरिटी सर्व्हिस एजन्सी (एसबीयू) शी संबंधित एका सूत्राने याची जबाबदारी घेतली होती.


पुतिन यांनी दोन दिवसांपूर्वी युद्ध थांबवण्यास तयार असल्याचे सांगितले होते. दोनच दिवसांपूर्वी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी युक्रेन युद्ध थांबवण्यास तयार असल्याचे सांगितले होते. यासाठी ते ट्रम्प यांच्याशी बोलण्यास तयार आहेत. पुतिन म्हणाले की, त्यांच्यामध्ये चार वर्षांहून अधिक काळ चर्चा झालेली नाही, पण ट्रम्प यांची इच्छा असेल तर ते त्यांना भेटण्यास तयार आहेत. बायडेन सरकार लवकरच युक्रेनसाठी शेवटचे सिक्युरिटी असिस्टन्स इनिशिएटिव्ह पॅकेज जाहीर करेल. अंदाजानुसार, युक्रेनला $1.2 बिलियनचे पॅकेज दिले जाईल. मात्र, खरी रक्कम जाहीर झाल्यानंतरच स्पष्ट होईल.

## सोरेगाव जवळील अपघातात तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** सैफुलहुन सोरेगावकडे दुचाकीवरून निघालेल्या तरुणाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने या अपघातात बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या आकाश अपूर्वा जाधव (वय 26, राहणार सोरेगाव) या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. अपघाताची ही घटना बुधवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास लोकांच्या निदर्शनास आली होती. याबद्दलची माहिती मिळताच भाऊ कृष्णा जाधव याने आकाशला शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.

## व्यायामशाळा विकास अनुदान योजनेसाठी अर्ज करा

**सोलापूर:** क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे



व्यायामशाळा विकास अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर मार्फत क्रीडांगण विकास अनुदान योजना व व्यायामशाळा विकास अनुदान या योजनेसाठी जिल्ह्यातील अनुसूचित जाती उपाययोजना, अल्पसंख्याक असलेल्या शाळा, महाविदयालये, प्राथमिक शाळा, निवासी प्राथमिक-माध्यमिक शाळा, मागासवर्गीय वस्तीगृह इत्यादीची समाविष्ठ असलेल्या शाळांनी आपले अर्ज कार्यालयात घेऊन जावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

## चेतन नरोटे यांनी साधला भाजपवर निशाणा



**सोलापूर :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस शकील मौलवी यांच्या वतीने विजापूर वेस येथे सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या उपस्थितीत या पुढच्या सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर व्हाव्यात यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या भागातील लोकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत स्वाक्षरी करून ईव्हीएमला आपला विरोध दर्शविला. यावेळी चेतन नरोटे यांनी भाजपवर निशाणा साधला.

# ना. गडकरी यांच्याकडे रस्त्यांसाठी निधीची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेऊन मतदार संघातील विविध रस्त्यांच्या कामाबाबत निवेदन देऊन संबंधित कामे मार्गी लावण्याची विनंती केली. यावेळी आमदार पाटील यांनी महाराष्ट्राचा आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठलाची मूर्ती देऊन गडकरी यांचे स्वागत केल. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी निवडणुकीदरम्यान मतदार संघातील नागरिकांना मतदारसंघातील रस्ते चकाचक करण्याचे आश्वासन दिले होते. मतदार संघातील रस्ते


» पान ३ वर




## माळशिरसमधील दादागिरी आता खपवून घेणार नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** माळशिरस तालुक्यातील एखाद्या गावामध्ये मते मिळाली नाहीत म्हणून गावामध्ये जाऊन केली जाणारी दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी नागपूरच्या अधिवेशनातून दिला. विधिमंडळाच्या मुख्यमंत्री अधिवेशनात फडणवीस यांनी मारकडवाडी येथील प्रकरणावर भाष्य केले. ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी ईव्हीएमवर शंका घेतल्याचे मला आश्चर्य वाटले. कारण शरद पवार हे देशातील अतिशय समन्वयवादी नेते आहेत. काँग्रेसच्या नेत्यांनी आजवर अनेकदा ईव्हीएमचा मुद्दा मांडला.

# पुस्तकरूपी संविधान प्रतिकृती उभारण्याचा जागतिक विश्वविक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पुस्तक महोत्सवात भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने पुस्तकरूपी संविधान प्रतिकृती उभारण्याचा जागतिक विश्वविक्रम शनिवारी करण्यात आला आहे. या विक्रमासाठी तब्बल १७ हजारांपेक्षा अधिक पुस्तकांचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे यंदाच्या पुस्तक महोत्सवात तिसरा विश्वविक्रम झाला आहे. या विक्रमाच्या निमित्ताने आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून, आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, संयोजन समितीचे सदस्य प्रविण तरडे, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, राहुल पाखरे, डॉ. संजय चाकणे, मंदार जोशी, मिलिंद कांबळे, सुनील भंडगे, स्वामिराज भिसे आदी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा विक्रम करण्यात आला आहे.

या विक्रमाच्या निमित्ताने संविधानाचा सन्मान करण्याचा प्रयत्न आम्ही केले आहे. या विक्रमासाठी अविरतपणे काम केलेल्या सर्व टीमचे मनापासून आभार मानतो, अशी माहिती पांडे यांनी दिली. पुस्तकांपासून तयार केलेले संविधानाचे हे सर्वात मोठे शिल्प आहे. त्यामुळे याची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. हे शिल्प साधारण १० मीटरचे आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाविकास आघाडीतील घटक पक्ष शिवसेना (यूबीटी) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याची शक्यता आहे. पक्षाचे नेते संजय राऊत यांनी याबाबत संकेत दिले आहेत. आगामी महापालिका निवडणुकीसंदर्भात आढावा घेण्यासाठी संजय राऊत पुणे दौऱ्यावर आहेत.

यादरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. मनपा निवडणुकी संदर्भात कार्यकर्त्यांशी आमच्या बैठका होणार असल्याचे त्यांनी सांगितले. महाविकास आघाडी अजूनही आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्वबळावर व्हाव्यात, अशी कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत उमेदवारांची संख्या जास्त असल्याने मनपा निवडणूक एकट्याने लढवण्याची पक्ष कार्यकर्त्यांची मागणी आहे. ते पुढे म्हणाले, उद्धव ठाकरे आणि पक्षाच्या इतर नेत्यांमध्ये यासंदर्भात चर्चा सुरू आहे. आम्ही एकट्याने निवडणूक लढवावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. अविभाजित शिवसेना भाजपसोबत युती असतानाही बीएमसी आणि इतर स्थानिक निवडणुकांमध्ये ते एकटेच लढायचे आणि आताही त्याच पद्धतीने निवडणुका लढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांच्या टीकेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना शिवसेनेचे (यूबीटी) खासदार संजय राऊत यांनी शनिवारी सांगितले की, राम मंदिर हे देशाच्या इतिहासातील एक चळवळ आहे आणि त्यात केवळ भाजप आणि पंतप्रधान मोदींनीच योगदान दिले नाही तर आरएसएस, शिवसेना, विहिंप आणि व्ही.एच.पी. या आंदोलनात काँग्रेससह सर्वांनीही हातभार लावला.

## कुत्री मरण पावल्याप्रकरणी सफाई कर्मचाऱ्यास अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट



शहरात १० ते १२ कुत्री मृत्यूप्रकरणी एकच गोंधळ उडाला होता. आरोपीला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. याबाबत उत्तर पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. अधिक माहिती अशी की, अक्कलकोट शहरात विष घातल्याने ठिकठिकाणी तब्बल १२ कुत्री मरण पावल्या होत्या. त्याविरोधात आंदोलन, मोर्चा, निषेध करण्यात आला. त्यानंतर फिर्यादी आशितोष कटारे यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी नगरपालिका येथील सफाई कर्मचारी परशुराम कांबळे यास पोलिसांनी अटक केली.

## पाठपुरावा....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सोलापुरातील विमानसेवेच्या प्रश्नावर खासदार प्रणिती शिंदे यांनी पुन्हा एकदा पाठपुरावा सुरू केला आहे. सोलापुरातून लवकरात लवकर विमानसेवा सुरू व्हावी यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापु यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. सोलापूरच्या विकासासाठी विमानसेवा अत्यावश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी मुंबई, दिल्ली, हैदराबाद, तिरुपती यासारख्या प्रमुख शहरांमध्ये थेट विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली आहे.

# अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे या मागणीसाठी

## आ.राजु खरे यांचे विधिमंडळाच्या पायऱ्यावर चक्क काळा ड्रेस घालून आंदोलन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे या मागणीसाठी मोहोळचे नूतन आमदार राजू खरे यांनी शनिवारी दि.२१ डिसेंबर रोजी विधिमंडळाच्या पायऱ्यावर चक्क काळा ड्रेस घालून आंदोलन केले आणि अख्या महाराष्ट्राचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले .मोहोळ तहसील कार्यालयाच्या मुद्द्यावरून गेले ४/५ महिने झाले तालुक्यात रान उठले आहे. या संदर्भात मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने वेगवेगळ्या स्वरूपाची आंदोलने केली आहेत. अनगर येथे झालेल्या अप्पर तहसील कार्यालय वास्तविक






तिथे होऊ नये त्याची गरज नाही अशी लोक भावना तालुक्यात होती. मात्र माजी आमदार राजन पाटील यांनी अट्टाहास करून हे कार्यालय तेथे सुरू करून घेतले. यासंदर्भात मोहोळ येथील काही युवकांनी चार दिवस आमरण उपोषण केले होते. तर यासाठी मोहोळ शहरात तीन दिवस बंद पाळण्यात आला होता. त्याचबरोबर पेनूर, कामती, नरखेड, शेटफळ, कुरुल आदि गावांमध्ये या निर्णयाच्या विरुद्ध बंद पाळण्यात आला होता. तर प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी या विरोधात मुंबई पर्यंत बैलगाडी मोर्चाचे आयोजन सुद्धा केले होते. मात्र या कशाचाही परिणाम न होता ते कार्यालय सुरू झाले. यादरम्यान विधानसभेची निवडणूक लागली आणि निवडणुकीत हाच मुद्दा गाजल्याने चांगले काम करून सुद्धा यशवंत माने यांना पराभूत व्हावे लागले .आणि त्यांच्या विरोधात दोन वेळा तिकीट बदलून मिळालेले राजू खरे यांचा दणदणीत विजय झाला. साहजिकच त्यांच्याकडून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत अशी मतदारांची अपेक्षा आहे. मात्र सध्या खातेवाटप नसल्याने नूतन आमदार राजू खरे यांनी महाराष्ट्राचे वेधण्यासाठी आणि हे कार्यालय तातडीने रद्द करण्यासाठी शनिवारी हा अनोखा उपक्रम केला. त्यांनी चक्क निषेधासाठी काळा ड्रेस घालून विधिमंडळाच्या पायऱ्यावर एक प्रकारे आंदोलन केले. यासंदर्भात त्यांना प्रतिक्रिया विचारले असता अधिवेशनासाठी वेळ कमी असल्याने विधिमंडळात


» पान 3 वर


## चारचाकी वाहनांच्या धडकेत दोन जखमी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** शिंगोली येथील राष्ट्रीय





महामार्गावरील पुलावर दोन चारचाकी वाहनांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात दोघे गंभीर जखमी झाले आहेत. अधिक माहिती अशी की, वाहन क्रमांक एमएच २०, बीसी ६४२३ ही चारचाकी सोलापूरहून मंगळवेढा दिशेने जात असताना मंगळवेढ्याकडून येणारी एमएच ०४, जीझेड २७४१ ची समोरासमोर धडक होऊन दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात प्रशांत कळमणकर (वय ४०), रेशमा कळमणकर (वय ३५, रा. बार्शी) हे जखमी झाले आहेत. हर्षद कळमणकर (वय १४), शहानूर शेख (४०, रा. बार्शी) हे किरकोळ जखमी आहेत.


वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!
सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ मध्ये सहा महिने घरपोच अंक
'दै.पंढरी संचार'
आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.
- संपर्क -
रविकिरण पाटील - 8208942346
दत्तात्रय बनसोडे - 9890976475
बुकिंग मर्यादा २८ डिसेंबरपर्यंत.

सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त धारकांचा पेन्शनर्स डे निमित्त कौन्सिल हॉल सोलापूर महानगरपालिका येथे सत्कार करण्यात आला. सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित यांच्या हस्ते मनपाच्या सेवानिवृत्त झालेल्या सेवकांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ओमप्रकाश वाघमारे, डॉ. अरुणधती हराळकर, माऊली पवार, ऐ. ऐ. पाठण, रुउफ बागवान, नाना शिर्के, अनिल विपत, सदाशिव उंब्रजकर, ए. ए. पठाण, रुउफ बागवान, एस. एस. रंगदाळ, व्ही. एस. कुलकर्णी, श्रीगणेश बिराजदार आदी उपस्थित होते.

### सांगोला रायडर्सच्यावतीने सांगोला- गोवा- सांगोला सायकल राईड यशस्वीरीत्या पुर्ण

# सांगोला सायकलर्स क्लबचा निसर्ग संवर्धनचा उपक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला** : सांगोला सायकलर्स क्लबच्यावतीने सांगोला- गोवा- सांगोला राईड निसर्गाचा मनमुराद आनंद घेत 877 किमीची यशस्वीरीत्या सायकल राईड पूर्ण झाली.

श्रीदत्त जयंतीचे दिवशी रायडर्सनी पहाटे 4 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अश्वारुढ पुतळ्याचे दर्शन घेऊन सुरूवात केली.

जूनोनी, नागज,शिरढोण मिरज मार्गे नर्सोबावाडी येथे कृष्णाकाठी स्नान करुन पादुकांचे दर्शन घेऊन कुरुंदवाड, बोरगाव(कर्नाटक), बेडकिहाळ, आकुळ मार्गे निपाणी येथे रायडर्स 175 किमीचा दिवसभरातील टप्पा पुर्ण करून आम्ही येथील धर्मवीर संभाजी महाराज चौकात पोहचलो. येथील निवासाची सोय निपाणी सायकलर्स कलबच्या वतीने करण्याय आली. दुसऱ्या दिवशीचा टप्पा सूरू झाला अन् पहाटेच आम्ही कोल्हापूर- बेंगलोर महामार्गाने निघालो निपाणी शहराबाहेरील तीव्र चढ असलेला घाट चढण करत निघालो, शेवटी आम्ही दीड तासात कसातरी गोवा वेस घाट सर केला. उत्तुर, गडहिंग्लज,आजरा येथील छोटे- मोठे घाट पुर्ण करत महाराष्ट्रातील सर्वात थंड हवेचे ठिकाण आंबोलिमध्ये पोहचलो येथील निसर्ग, डोंगरदऱ्या बघून आमचा दिवसभराचा थकवा नाहीसा झाला. येथील धबधब्यात मनसोक्त भिजण्याचा आनंद घेतला नंतर आंबोली घाट उतरत सावंतवाडी दिशेने निघत वेडी वाकडी वळणे अवघड घाट 25 किमीचा उतरत विविध पक्ष्यांचे किलबिलाट ऐकत, निसर्गाची अद्भुती घेत सावंतवाडीकरत बांदा या शहरात 130 किमी ची राईड करत पोहचलो.

तिसऱ्या दिवशी बांदा- पणजी (गोवा मुंबई )महामार्गने प्रवास करत पत्रादेवी मार्गे पेडणे शहरात प्रवेश केला. या गावातून संपूर्णपणे समुद्रकिनारे बाघा, कलंगुट, मिरामार अशे अनेक किनारे पहायला मिळाले त्यानंतर पणजी, जुन्या गोव्यातील मंदिरे, चर्च अशा ऐतिहासिक, पर्यटन विविध स्थळांना भेटी देऊन प्रदूषणमुक्तीचा,निसर्ग संवर्धनचे महत्व यविषयी सायकलींग द्वारे प्रबोधन केले. परतीच्या प्रवासात कुडाळ, कणकवली, फोंडा, दाजीपूर अभयारण्य, राधानगरी मार्गे कोल्हापुरात राईड पोहचली, कोल्हापूर -सांगोला 155 किमी अंतर रायडर्सनी रेकॉर्ड ब्रेक विना थांबा 11तासात यशस्वीरित्या हे अंतर पूर्ण केले. या पूर्वीही सांगोला रायडर्सनी यापूर्वी अनेक राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय सायकलिंग पूर्ण केले आहे. सायकल प्रवासामध्ये प्रकाश खडतरे, माधव शिंदे, बाळकृष्ण टापरे या रायडर्सनी हे अंतर पार करून जागोजागी निसर्गसंवर्धनाची जागृती केली.

> ● सध्या धावपळीच्या जीवनात कोणालाच आरोग्य करिता वेळ नसल्याने प्रत्येक जण वाहनांचा वापर करीत असल्याने प्रदूषण वाढत आहे याच्या उलट आम्ही सायकलवर सांगोला- गोवा- सांगोला राईड करण्यामागचा हेतू पर्यटन, धार्मिक ,ऐतिहासिक स्थळांना भेटी देताना कमीत- कमी वाहनांचा वापर करने गरजेचे आहे तरच येथील निसर्ग, समुद्रकिनारे, धबधबे भविष्यात आपन पुढच्या पिढीला दाखवू शकु अन्यथा कचरा, वाहनांचे प्रदूषणाने येथील अस्तित्व संपुष्टात येऊ शकते. यासाठी सांगोला सॉयकलर्स क्लबच्या माध्यमातुन आम्ही सर्वांनी प्रयत्न केला आहे.
>
> **निलकंठ शिंदे सर,** सायकल राईडर सांगोला

## मंगळवेढ्यात भीषण अपघात, युवकाचा जागीच मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा** : मंगळवेढ्यात एक भीषण अपघात झाला असून या अपघातामध्ये एका युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे तर एक पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाल्याची घटना पहाटे 1.17 च्या सुमारास मंगळवेढा-पंढरपूर रोडवरील वीरशैव मंगल कार्यालय समोर घडली आहे. उमेश अशोक आवताडे (वय 39 रा. मंगळवेढा) या युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे तर दौलतराव लिंगाप्पा तळवार हे पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत. याची खबर पोलीस कर्मचारी कृष्णा जाधव यांनी दिली आहे. या अपघाताबाबत पोलीसात नोंद झाली असून या अपघाताचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## » Selected

### सांगोला मतदार संघातील प्रश्न केले उपस्थित



**सांगोला** : हिवाळी अधिवेशनात बोलताना विधानसभेत सांगोला विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्न उपस्थित आमदार बाबासाहेब देशमुख यांनी उपस्थित केले. करून हे प्रश्न लवकर सोडविण्याच्या संदर्भात राज्य सरकारला लवकरात लवकर कार्यवाही करण्याची मागणी केली. गेल्या पाच वर्षांमध्ये मतदार संघ हा मागासच राहिला आहे. बाबासाहेब देशमुख हे स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचे नातू आहेत.

## अफवा कोणीही पसरवू नये



**सोलापूर** : सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर सायबर पोलिसांचे नियमित विशेष लक्ष असते. दोन जाती-धर्मांत तेढ निर्माण होईल, अशी अफवा कोणीही पसरवू नये. सोशल मीडियावरून अफवा पसरविली आणि त्यातून काही अनुचित प्रकार घडल्यास संबंधितास कठोर शिक्षा होऊ शकते. सोशल मीडियावरील प्रत्येक हालचाल पोलिसांना समजतेच. त्यामुळे आरोपीला सहजपणे शोधता येते. सर्वांनी समाजात शांतता व सुव्यवस्था टिकून राहण्यासाठी प्रयत्न करावा अशी अपेक्षा आहे. कोणीही अफवा पसरवू नये असे आवाहन पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.

## थंडीचा प्रभाव कमी होण्यास सुरुवात



**सोलापूर** : बंगालच्या उपसागरात गुरुवारी कमी दाबाचा पट्टा तयार झाला. त्यामुळे राज्यात बाष्पयुक्त वाऱ्यासह ढग येण्यास सुरुवात झाल्याने राज्यातील थंडी कमी होण्यास सुरुवात झाली आहे. तापमानात किंचित घट होण्यास सुरुवात झाली असून आगामी तीन दिवस ढगांमुळे थंडीचा प्रभाव कमी राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातही थंडीचा प्रभाव कमी जाणवू लागला आहे.

### श्री शंकर सह.साखर कारखाना लिमिटेड सदाशिवनगरचा

# दुसरा हप्ता बँक खात्यावर वर्ग करण्यास सुरुवात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड सदाशिवनगर सन 2024-25 च्या गळीत हंगामासाठी गळीतास आलेल्या ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासदांची ऊस बिले दिनांक २६/११/२०२४ ते ०५/१२/२०२४ पर्यंतचा प्रथम अॅडव्हान्स दुसरा हप्ता रक्कम रू 2750/- प्रति मे. टन प्रमाणे तसेच बिगर ऍडव्हान्स तोडणी वाहतुकीची दुसऱ्या मस्टर ची बिले दिनांक २०/१२/२०२४ रोजी सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी वाहतूक कंत्राटदारांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यास सुरुवात केली आहे. दुसऱ्या पंधरवड्याची बिले दहा दिवसात देणारा जिल्ह्यातील पहिला कारखाना म्हणून श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि सदाशिवनगर ठरला.

श्री शंकर सहकारी साखर कारखाना चेअरमन आ.मा.श्री रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, सभासद, व्यापारी, कंत्राटदार, वाहतूकदार यांचा कायम विश्वास दाखवून सर्वांची विश्वासार्हता जपून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे.

### आ. सुभाष देशमुख यांची ' या ' कार्यक्रमाला उपस्थिती

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे बंगळुरू येथे आयोजित केलेल्या 8 व्या युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर 2024 या विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. वी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. यावेळी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या फेअरमध्ये विविध ब्रँड्स, उत्पादक, वितरक, होलसेलर्स, रिटेलर्स, एजंट्स, ई-कॉमर्स कंपन्या आणि रिटेल चेन यांना एकत्र येऊन व्यवसाय विस्तारासाठी नवी संधी निर्माण करण्याचा उद्देश आहे.

## आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**पंढरपूर** : शनिवार दि २१ डिसेंबर रोजी पहिला आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस निसर्गोपचार केंद्र त्याचबरोबर हार्टफुलनेस इन्स्टिट्यूट ऑफ मेडिटेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथे मोहिते हॉस्पिटल हॉल मध्ये सकाळी साडेसहा वाजता पार पडला निसर्गोपचार केंद्राच्या प्रमुख डॉ. ज्योती शेटे यांनी ध्यान दिवसाचे महत्व सांगून यामध्ये सहभाग नोंदविला.

## दौंड रेल्वे गाडी ताशी १३० किमी वेगाने धावणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा** : ेल्वे मार्गाचे अपग्रेडेशन झाल्यानंतर पुणे-दौंड नंतर आता सोलापूर-दौंडदरम्यानच्या मार्गावरही रेल्वे गाड्या ताशी १३० कि. मी. वेगाने येत्या काही दिवसांत धावतील. लवकरच याची अंमलबजावणी होणार असून पुणे-सोलापूर या मार्गावर रेल्वे ताशी १३० धावणार आहे. येत्या १५ दिवसांत याची अंमलबजावणी होणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीना यांनी दिली. यामुळे पुणे-सोलापूर दरम्यानचा प्रवास सुसाट होणार आहे. मागील एक वर्षापासून पुणे विभागातून पुणे-दौंड दरम्यान रेल्वे ताशी १३० कि. मी. वेगाने धावत आहेत.

# मोजणी शुल्कात १४ वर्षांनंतर वाढ



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : ज्या सरकारने जमीन मोजणी शुल्कात १४ वर्षांनंतर वाढ केली आहे. यापुढे चारऐवजी केवळ दोन प्रकारातच शुल्क आकारणी केली जाणार आहे. २७ सप्टेंबर रोजी निघालेल्या या आदेशाची एक डिसेंबरपासून अंमलबजावणी सुरू झाली असून यामुळे जमीन मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता येऊन वेगाने सेवा मिळणार आहे. राज्यात २०१० नंतर प्रथमच जमीन मोजणी शुल्कात वाढ करण्यात आली आहे. प्रशासकीय खर्चात वाढ झाल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

## सोलापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या अनुदान तालुका संघटक सहसचिव पदी सुजाता गाडगीळ यांची निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस** : सोलापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या नूतन माळशिरस तालुका संघटक सहसचिव पदी सुजाता गाडगीळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. माळशिरस मधील संत सावतामाळी मंगल कार्यालय येथे झालेल्या पगारवाढ आनंदी मेळाव्यात महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष सूर्यमणी गायकवाड व सोलापूर जिल्हा सरचिटणीस सरला ताई चाबुकस्वार यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झाली. यावेळी माढा तालुका अध्यक्ष हेमा ताई गव्हाणे,वर्षा सटाळे,सांगली जिल्हा अध्यक्ष आनंदी भोसले,उपाध्यक्ष नदीरा नदाफ, वर्षा भोसले, माळशिरस तालुका अध्यक्ष अनिता सावळकर, उपाध्यक्ष कमल ठोंबरे, ममताबी काझी, जयश्री काटे, माधुरी मोरे सर्व पदाधिकारी, माळशिरस तालुक्यातील सर्व बीट प्रमुख सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस कार्यक्रमास उपस्थित होत्या. यावेळी सरला ताई चाबुकस्वार बोलताना म्हणाल्या कि अंगणवाडी सेविकांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमध्ये त्याचबरोबर कोरोनामध्ये अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडली व जनतेची सेवा केलेली आहे. यांची दखल घेऊन राज्य शासनाने पगार वाढ केलेली आहे यापुढेही सर्व कर्मचाऱ्यांनी कौतुकास्पद काम करावे काही अडचण असल्या संघटनेची संपर्क साधावा असे आव्हान यावेळी करण्यात आले आहे. यावेळी नूतन संघटक सहसचिव सुजाता गाडगीळ यांचा सत्कार संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी गाडगीळ म्हणाले की मी गेले कित्येक वर्ष संघटनेचे सदस्य म्हणून काम करत असताना महिलांच्या अनेक अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे संघटनेने माझ्यावर संघटक सहसचिव पदाची टाकलेली जबाबदारी मी यशस्वीपणे पार पाडेल असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हे प्रियंका माने पाटील यांनी केले व आभार प्रदर्शनअनिता सावळकर यांनी केले.

## 5% शुल्क भरा अन् गुंठेवारी खरेदी-विक्रीस मिळवा परवानगी



**सोलापूर** : राज्यातील 1 ते 5 गुंठे जमिनीचे तुकडे नियमित करण्यासाठी सरकारने मोठा दिलासा दिला आहे. आता या तुकड्यांच्या खरेदी-विक्रीसाठी बाजारमूल्याच्या फक्त 5% शुल्क भरून व्यवहार नियमित करता येईल. यासाठी प्रांताधिकारी किंवा नगरपालिका अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र घ्यावे लागेल. विहीर, रस्ता किंवा घर बांधण्यासाठीच व्यवहारांना परवानगी मिळणार आहे. 2017 मधील 25% शुल्क कमी करून 2024 पर्यंत मुदतवाढ दिल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. तुकडेबंदी कायद्यातील या सुधारणांमुळे अनेक अडकलेले व्यवहार मार्गी लागणार आहेत.




### शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये

# साजरा झाला बाल व्यावसायिकांचा आठवडी बाजार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : शनिवार दिनांक 21 डिसेंबर रोजी शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शेतकरी दिनाचे औचित्य साधून आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन आणि शेतकी अवजारांचे पूजन करुन पाहुण्यांच्या हस्ते झाली. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे शिवरत्न शिक्षण संस्थेचे संचालक मा.श्री शिवदास माधव शिंदे आणि अध्यक्ष ज्येष्ठ एल एम सी मेंबर एच डी भोसले सर तसेच मंचावर उपस्थित शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचे चेअरमन मा श्री रामकृष्ण पांडुरंग काटकर सर, शंकर काशिनाथ गायकवाड सर, जिल्हा परिषद माजी केंद्रप्रमुख विठ्ठल नष्टे सर, जिल्हा परिषद यशवंतनगर शाळेचे मुख्याध्यापक मा श्री बंडू खडतरे सर तसेच माता पालक संघाच्या उपाध्यक्ष मा सौ सुषमा शिंदे आणि शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष मा श्री सचिन बोरावके सर आदी मान्यवरांचा सन्मान प्रशालेचे मुख्याध्यापक माननीय श्री जितेंद्र माने देशमुख सरांनी केला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.श्री जितेंद्र माने देशमुख सरांनी केले.

यानंतर विद्यार्थ्यांचे विविध कला गुणदर्शनपर कार्यक्रमात - भाषण तसेच शेतकरी समूहनृत्य यांचे सादरीकरण अतिशय उत्कृष्टरित्या विद्यार्थ्यांनी केले. प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांच्या भाषणानंतर मान्यवरांच्या हस्ते आठवडी बाजाराचे उद्घाटन रिबीन कट करून करण्यात आले.

आठवडी बाजारामध्ये विद्यार्थ्यांचा अतिशय उत्स्फूर्त सहभाग पाहुण्यांना पाहायला मिळाला. गावात ज्याप्रमाणे आठवडी बाजार भरतो अगदी त्याच पद्धतीने सर्व भाज्या, फळे, स्नॅक्स, कोल्ड्रिंक्स या सर्वांचा समावेश विद्यार्थ्यांनी आठवडी बाजारामध्ये केला होता. प्रमुख पाहुण्यांसमवेत सर्व शिक्षक तसेच पालक वर्ग देखील सर्व खरेदी करताना पाहायला मिळाला.

विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान मिळावे तसेच फायदा तोटा याची आकलन व्हावे आणि मार्केटमध्ये गेल्यानंतर कशा पद्धतीने खरेदी करावी याचे ज्ञान मिळवण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अतिशय उपयुक्त ठरणार आहे.

अशा पद्धतीने अतिशय जोशपूर्ण, उत्साही आणि आनंददायी वातावरणात हा आठवडी बाजार सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकशालेतील शिक्षिका सौ शिल्पा जाधव तर आभार प्रदर्शन सौ अजरिन मुजावर मॅडम यांनी केले.

**सोलापूर :** परभणी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतिकृतीची विटंबना व तोडफोड करून संविधानाचा अपमान करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन तात्काळ कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी रासपचे अंगद देवकते यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. परभणीतील संविधान प्रतिकृती तोडफोडीच्या निषेधार्थ शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असताना अनेक भीम सैनिक अनुयायांकडून जो उद्रेक झाला त्या संदर्भातील विविध गुन्हे दाखल झाले आहेत. ते गुन्हे रद्द करून त्यांना दोषमुक्त करण्यात यावेत.

# जागतिक किर्तीच्या सवाई महोत्सवात ज्ञानेश्वर दुधाणे यांची पखवाज सेवा

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** अभिजात शास्त्रीय संगीताची पंढरी म्हणून ओळखला जाणारा जागतिक किर्तीच्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची सुरुवात झाली असून पाच दिवस चालणाऱ्या या ७० व्या संगीत महोत्सवात शुक्रवार दिनांक २० डिसेंबर रोजी दुसऱ्या सत्रात भारतरत्न भिमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांचे बरोबर करकंब (पंढरपूर) येथील ज्ञानेश्वर दुधाणे पखवाज साथसंगत करण्याची संधी मिळाली. पं.श्रीनिवासजी जोशी आणि शिल्पाताई जोशी यांचे मुळे मिळत असून एका ग्रामीण भागातील कलाकाराला ही संधी अतिशय महत्त्वपूर्ण होतदुधाने यांनी या आधीही ६३ व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात पं.शौनक अभिषेकी. यांचेबरोबर साथसंगत केली असून महाराष्ट्र भर विदुषी मंजुषा ताई पाटील,पं.रघुनंदन पणशीकर.पं.जयतिर्थ मेऊंडी. पं.आनंद भाटे.आरतीताई अंकलीकर,पं.राहूल देशपांडे. पं.रोणू मुजूमदार आरतीताई अंकलीकर.अशा अनेक कलाकारांबरोबर पखवाज साथसंगत करण्याचे भाग्य लाभले.

महाराष्ट्रा बरोबर दिल्ली.छत्तीसगड.हरियाणा.कर्नाटक. गुजरात.आदी राज्यातही ख्यातनाम कलाकारांबरोबर पखवाज साथसंगत केली आहे.पंढरपूर येथे पद्मश्री जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव.विठ्ठल रुक्मिणी नवरात्री संगीत महोत्सव संगीत महोत्सव .पं.विकास कशाळकर फाऊंडेशन आयोजित संगीत महोत्सव चे आयोजन करण्यासाठीही मोठा सक्रिय सहभाग असतो. पेशाने प्राथमिक शिक्षक असून संगीता बरोबर शैक्षणिक. पर्यावरण.सामाजिक.आध्यात्मिक कार्याची ही आवड असणारे व्यक्तिमत्त्व असून आतापर्यंत ७०० मोठ्या झाडांचे यशस्वी वृक्षारोपण करुन झाडे जोपासना करत आहेत. विराज जोशी यांचे बरोबर तबलावादक पांडुरंग दादा पवार हार्मोनियम अविनाश दिघे टाळ माऊली टाकळकर करणार आहेत.विराज जोशी यांचे नंतर जागतिक किर्तीच्या गायिका कौशिकी चक्रवर्ती यांचे गायन होत आहे .

# उद्धव ठाकरे, राहुल गांधी, प्रियांका गांधी, केजरीवाल देणार मारकडवाडी गावाला भेट



■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मारकडवाडी ग्रामस्थांनी प्रशासनाच्या विरोधात पुकारलेल्या आंदोलनाला आता आणखी व्यापक स्वरूप येणार आहे. शिवसेनेचे नेते उद्धवजी ठाकरे, काँग्रेसचे नेते खा. राहूल गांधी , प्रियंका गांधी, केजरीवाल मारकडवाडी गावाला भेट देणार आहेत. पाच जानेवारीला उद्धव ठाकरे मारकवडवाडी येथे येणार असून राहूल गांधी, प्रियंका गांधी केजरीवाल 10 जानेवारीला मारकरवाडी येथे येणार असल्याची माहिती आ. उत्तम जानकर यांनी दिली.माळशिरस तालुक्यातील मारकवडवाडी येथे अपेक्षेपेक्षा कमी मते मिळाल्याने येथील नवनिर्वाचीत आमदार उत्तम जानकर यांच्यासह काही ग्रामस्थांनी इव्हीएम मशिनचा घोटाळा असल्याचा आरोप केला. त्यानंतर बॅलेटपेपरवर या गावचे मतदानघेण्याची मागणी केली. प्रशासनाने ती मागणी फेटाळली. त्यानंतर आ. उत्तम जानकर यांच्यासह काही जणांनी मिळून बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची तयारी सुरू केली. परंतु प्रशासनाने त्यास विरोध दर्शवत तब्बल ८९ जणांवर गुन्हे दाखल केले.त्यानंतर हे प्रकरण आता अधिकच चिघळत चालले असून उद्धव ठाकरे 5 जानेवारी रोजी तर राहुल गांधी प्रियंका गांधी व केजरीवाल हे 10 जानेवारी रोजी मारकवाडी येथे भेट येणार आहेत. विशेष म्हणजे हे गाव ज्या मतदारसंघात आहे त्या माळशिरस मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उत्तम जानकर हे सुमारे १३ हजार मतांनी निवडून आले आहेत. परंतु मारकडवाडी गावातून त्यांना अपेक्षीत असे मताधिक्क्य मिळाले नाही.. तर संपूर्ण गाव आपल्यासोबत असतानाही मताधिक्क्य मिळाले नसल्याने हा ईव्हीएम घोटाळा असल्याचा आरोप करण्यात आला. आता या प्रकरणाला आणखी व्यापक स्वरूप देण्यासाठी उद्धव ठाकरे ,राहुल गांधी ,प्रियंका गांधी, केजरीवाल मारकडवाडी येथे येणार आहेत.

» पान १ वरुन

## काळाचा घाला..

चंद्रम इगाप्पागोळ (वय ४६), पत्नी धोराबाई इगाप्पागोळ (४०), मुलगा गण इगाप्पागोळ (१६), मुली दिक्षा (१०), आर्या (६), चंद्रम एगाप्पागोळ यांच्या भावाच्या पत्नी विजयालक्ष्मी (३५) अशी मृतांची नावे आहेत. चंद्रम इगाप्पागोळ हे मूळचे सांगलीच्या जत तालुक्यातील मोराबागी गावातील रहिवासी आहेत. ते बेंगलोर येथे सॉफ्टवेअर कंपनीत नोकरीला होते. तुमकूर-बेंगळूरु राष्ट्रीय महामार्गावरील बेंगळुरू ग्रामीण जिल्ह्यातील नेलमंगला तालुक्यातील तळकेरे गावाजवळ ही दुर्घटना घडली. अपघातानंतर महामार्गावर १० किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मोठा कंटेनर कारवर पडल्याने कारचा पार चक्काचूर झाला होता. कंटेनरच्या खाली दबलेल्या कारमधून प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी पोलिसांना शर्थीचे प्रयत्न करावे लागले. ओव्हरलोड माल लादल्याने कंटेनर पलटी झाला. ३ क्रेनच्या सहाय्याने लॉरी बेल्ट आणि साखळी वापरून कंटेनर उचलण्यात आला.

## ना. गडकरी यांच्याकडे रस्त्यांसाठी निधीची...

पूर्ण व्हावेत यासाठी त्यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन माढा मतदारसंघातून जाणारा श्री संत मुक्ताई पालखी महामार्गाला राज्य महामार्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. माढा मतदारसंघातून करमाळा- टेंभुर्णी- पंढरपूर- मंगळवेढा रस्ता चौपदरी करावा. पंढरपूर (तिर्हेमार्ग) देगाव- सुस्ते- टाकळी सिकंदर- कुरुल रस्ता चौपदरी करावा. याचबरोबर मतदारसंघातील अनेक रस्त्यांच्या कामाबाबत निवेदन देऊन लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नांमुळे मतदार संघातील रस्ते चकाचक होणार आहेत.

## आ.राजु खरे यांचे विधिमंडळाच्या ....

हा प्रश्न उपस्थित करता आला नसला तरीही सरकारचे कामकाज सुरू होताच हे कार्यालय रद्द करण्यासाठी जोमाने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून मी हे आज आंदोलन केले आहे असेही आमदार खरे यांनी या प्रतिनिधीला सांगितले यावेळी त्यांच्यासोबत मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर उपस्थित होते. यामुळे आमदार खरे यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# माळशिरस तालुक्यातील आरोग्य विभागातील महिलांचा वाद पोलीस ठाण्यात पोहोचला...



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** शंकरनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कामा संबधी निवेदन देण्यासाठी गेलेल्या आशा सेविकांना तेथे उपस्थित असलेल्या आरोग्य सेविकेने विनाकारण शिवीगाळ केल्याची तक्रार अकलूज पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,लाल बावटा आशा वर्कर्स युनियन संघटनेच्या जिल्हाध्यक्षा तथा शंकरनगर प्रथामिक आरोग्य केंद्र याठिकाणी आशा सेविका म्हणून काम करीत असलेल्या रुपाली दोरकर या सकाळी 11 वा.चे सुमारास वैद्यकीय अधिकारी यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यासाठी गेल्या होत्या.त्यावेळी त्या ठिकाणी महाळुंग येथे कार्यरत असलेल्या शमा पठाण -जगताप आल्या. विनाकारण शिवीगाळ करीत अपशब्द वापरून सभासद व संघटना यांच्याबाबत चुकीचे शब्द वापरून संघटनेला बदनाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे.विनाकारण शिविगाळ करु नका म्हणल्यावर आपणास मारण्याची धमकी ही दिल्याची फिर्याद रुपाली दोरकर यांनी अकलूज पोलीस ठाण्यात दिली.त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीसांनी गु.र.नं 1617/2024 BNS कलम 352.351(2)351 (3)अन्वये आरोपी विरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.फिर्यादी आशा सेविका व संघटनेच्या इतर सेविकांनी जि ल्हा पोलीस अधिक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनाही प्रत्यक्ष भेटुन झालेला प्रकार सांगितला.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



पंढरपूर : मा दत्ता मामा भरणे यांची कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना आदित्य फत्तेपूरकर, पंकज देवकते यांच्यासह मित्र परिवार.



**पंढरपूर :** पत्रकार संकेत कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त 'पंढरी संचार ' च्या वतीने त्यांना शुभेच्छा देताना अनिरुद्ध बडवे, सोबत सौ. विनया कुलकर्णी - उत्पात.

## सीताफळ, पेरू पाठोपाठ केळीने दिला दणका



**सोलापूर :** यावर्षी पावसाने शेतकऱ्यांना साथ दिली, पण बाजारभावाने दणका दिल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. शंभर, सव्वाशे रुपये किलो प्रमाणे जाणारे सीताफळ चक्क पंधरा ते तीस रुपये किलोने विकले जातात. ८० ते १०० रुपये किलो जाणारा पेरू चक्क २० ते ३० रुपये किलोने विकला जावू लागला आहे. आता केळ्याचीही तिच गत झाली असून ३० रुपये किलोने जाणारी केळी चिलींगच्या नावाखाली ९ ते १० रुपये किलोने मागितली जात आहे आणि शेतकऱ्यांना त्याच भावात केळी विकावी लागत आहे. अशा स्थितीत शासनाने केळी उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान दिले पाहिजे.

## अमित शहा यांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध

**सोलापूर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त विधानाचा भीमदल संघटनेकडून निषेध करण्यात आला आहे. त्यांच्या विधानामुळे नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत. बेजबाबदारपणे वक्तव्य करणाऱ्या शहा यांनी गृहमंत्री पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा, अन्यथा शिव फुले शाहू आंबेडकर विचाराचे पाईक आणि भीमसैनिक रस्त्यावर उतरून ठिकठिकाणी आंदोलने करतील, असा इशारा भीमदल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील भोसले यांनी दिला आहे.

## पर्स हिसकावून दीड लाखांचे सोन्याचे दागिने चोरले



**बार्शी :** बार्शी शहरातील कुर्डवाडी रोडवरील चोप्रा हॉटेलसमोर तीन चोरट्यांनी सुमारे दीड लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि महत्त्वाचे कागदपत्रे असलेली महिलेच्या हातातील पर्स हिसकावून पळ काढला. याप्रकरणी शर्मिला उत्तमराव पाटील (राः सन्मित्र हौसिंग सोसायटी, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शर्मिला पाटील या पतीसोबत गुरुवारी दुपारी बाजारात गेल्या होत्या. घरी परत आल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी ताबडतोब पोलिसात तक्रार दाखल केली.

# स्मिता अधटराव यांची कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकेस सदिच्छा भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**भंडीशेगांव :** भंडीशेगाव ता. पंढरपूर येथील कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकेस पंढरपूर येथील स्मिता गणेशभाऊ अधटराव यांनी सदिच्छा भेट दिली. स्मिताताई या इसबावी येथील सामाजिक कार्यकर्ते नगरसेवक गणेशभाऊ अधटराव यांच्या सुविद्य पत्नी आहेत. यावेळी भंडीशेगाव च्या माजी सरपंच मनीषा येलमार उपस्थित होत्या. यावेळी मनिषा येलमार यांच्या हस्ते स्मिता अधटराव यांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागात विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अभ्यासिका खूप महत्त्वाची असते अशा प्रकारची अभ्यासिका भंडीशेगाव येथे खूप चांगल्या प्रकारे चालवीत असल्याचे समाधान स्मिता अधटराव यांनी यावेळी व्यक्त केले. श्रीनाथ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिका चालवली जात असून लवकरच या ठिकाणी स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालय सुरू करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्रीधर येलमार यांनी यावेळी दिली. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांसाठी मोफत स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालय सुरू करण्यात येणार असल्याच्या उपक्रमाचे कौतुक पल्लवी गुराडे यांनी केले. यावेळी पंढरपूर येथील चैताली कवडे, पल्लवी गुराडे, वर्षा येलमार, माजी सरपंच मनीषा येलमार आदी उपस्थित होते.

## पाहिजेत

आमच्या कंपनीसाठी खालील जागा भरावयाची आहे.
* कॉम्प्युटर ऑपरेटर *
टॅली, जीएसटी अकौंटींग कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
योग्य पगार दिला जाईल. तरी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
**श्री पद्मावती ट्रेडिंग कंपनी,पंढरपूर**
**प्रोप्रा.अभिजीत उत्तम कौलवार**
**मो.नं.९४०५२४०४८९/८९९९५५०२३४**




## खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची लोकसभेत मागणी

# बार्शी रेल्वे स्टेशनचा अमृत भारत योजनेतून विकास करा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** लातूर मुंबई रेल्वे मार्गावरील बार्शी हे मोठे व्यापारी पेठ असलेले शहर आहे. या शहरातून पंढरपुरकडे तसेच पश्चिम महाराष्ट्रात रेल्वेने जाणाऱ्या प्रवाश्यांची तसेच व्यापारांची मोठी संख्या आहे. सरकारच्या अमृत भारत योजनेत समावेश करुन स्थानकाचा विकास करणेबाबतची मागणी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत बोलताना केली.





गतवर्षी रेल्वे मंत्रालयाकडून महाराष्ट्रातील अनेक रेल्वे स्थानकांचा समावेश करुन विकास करण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत स्थानकातील परीसरांचे सुशोभीकरण करण्यात येवून रेल्वे स्थानकाचे सुधारीत स्थानकात रुपांतर करण्यात येणार असून स्थानिक सांस्कृतीक व अन्य महत्वाचे प्रसंग साकारण्यात येत असल्यामुळे रेल्वे स्थानकाविषयी प्रवाश्यांमध्ये व नागरीकांमध्ये जिव्हाळा निर्माण होत आहे.

धाराशिव लोकसभा मतदार संघातील बार्शी या स्थानकाचा विकास अमृत भारत योजनेतून करण्यात यावा अशी मागणी लोकसभेत रेल्वेच्या संदर्भात बोलत असताना खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सभागृहात करुन सदर प्रश्नावर मा. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनाची सांगता होत असताना केंद्र सरकारने मांडलेले 'एक देश एक निवडणूक' हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले आहे. २०१५ मध्ये मी निवडणूक आयोगात असतानाच सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्यात निवडणूक आयोगाला अडचण येणार नाही, असे सांगितले होते. कोविद समितीपुढे बोलताना, लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याचा प्रयोग आधी करावा. तो यशस्वी झाल्यानंतर एकाच वेळी किंवा काही दिवसांच्या अंतराने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या दिशेने वाटचाल करायला हवी, असे मी सांगितले. तथापि, देशात एकत्रित निवडणुका घ्यायच्या का, घ्यायला हव्यात का, यावर साधकबाधक चर्चा झाली पाहिजे. यासाठी सरकारने सर्व पक्षांची संमती घ्यायला हवी आणि त्यांची मतेही समजून घेतली पाहिजेत. या पक्षांची पर्वा न करता हा निर्णय राबवल्यास यामागील चांगल्या हेतूला नक्कीच धक्का बसेल.**

## टिचकी

# अ-मानवी



**हिमांशु चौधरी**

माणसाचं काम मशीन करू लागलं आणि श्रम कमी झाले. परंतु दुसरीकडे, माणसाला काम न मिळण्याचं ते एक महत्त्वाचं कारणही ठरलं. आज आपण हुबेहूब आपल्यासारखाच ह्युमनॉइड तयार केलाय. आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, व्हर्च्युअल रिॲलिटी, इंटरनेट ऑफ थिंग्ज अशा तंत्रज्ञानानं आपली दुनियाच बदलून टाकली. परवाच एका मित्राने चॅटबॉटला विषय देऊन त्याच्याकडून एक कविता करून घेतली. एवढंच नव्हे तर तिला चाल लावून घेतली. हे सगळंच थक्क करणारं आहे. अर्थात, आश्चर्यापलीकडे जाऊन काही प्रश्नही पडले. काही दिवसांनी बँकांना इमारतीच लागणार नाहीत, कारण त्या व्हर्च्युअल बँका असतील. इमारतीच नकोत म्हटल्यावर स्टाफ कशाला हवा? चालकाविना चालणारी कार आलीच आहे. विनाशिक्षक डिजिटल क्लासरूम येतायत. आता तर तंत्रज्ञान गीतकार आणि संगीतकारही झालंय. प्रत्येक क्षेत्रात तंत्राने सगळं आयतं हातात आणून दिलं, तर माणसांनी करायचं काय? हा एक भलामोठा प्रश्न काही दिवसांनी आपला पिच्छा पुरवणार आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातले लोक म्हणतात, नवीन तंत्रज्ञान शिका. नवीन प्रकारचे जॉब मिळतील. परंतु जाणारे जॉब आणि मिळणारे जॉब यांच्या संख्येतलं अंतर आजवर कुणी मांडलेलं दिसत नाही. बेरोजगार तरुणांचा आकडा फुगत चाललाय, हे वास्तव कुणी नाकारू शकत नाही. यंत्राला माणूस बनवल्यानंतर आता माणसाला यंत्र बनवून बेरोजगारीची क्रूर थट्टा जातेय, हे मात्र अतिशय गंभीर आहे.

बंगळुरू शहरात एक 'मानवी जाहिरात' सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. जाहिरातीसाठी सगळी माध्यमं वापरून झाल्यानंतर ही 'क्रिएटिव्ह आयडिया' पुढे आली आहे. एका स्टार्टअपने जाहिरातीसाठी चक्क माणसांचा वापर केलाय. अर्थात, माणसांनी डोक्यावर पाटी घेऊन घरोघर जाऊन भाजी किंवा वस्तू विकणं आपल्याला नवीन नाही. परंतु तरीही या क्रिएटिव्ह संकल्पनेवर नेटकऱ्यांनी जोरदार हल्ला चढवलाय. एका फूड डिलिव्हरी स्टार्टअपने माणसांच्या पाठीवर फलक लावून त्यांना शहरातून चालण्याचा 'जॉब' दिलाय. खरंतर 'नव्या प्रकारच्या' नोकऱ्यांमध्ये 'डिलिव्हरी बॉय' हे क्षेत्र मोठं आहे. कष्ट करून पोट भरल्याचं समाधान तरी या जॉबमध्ये आहे. पण खांद्यावर फलक लटकवून शहरातून फिरण्याचा हा 'जॉब' खरोखर बेरोजगारांची टिंगल करणारा आहे. सोशल मीडियावर एक फोटो व्हायरल झाला. त्यात तीन ते चार जण पाठीवर फलक लावून शहरात फिरताना दिसत आहेत. वास्तविक, जाहिरातीची नवकल्पना राबवल्याचा आनंद संबंधिताला झाला असणार; पण या फोटोवर ज्या प्रतिक्रिया आल्या, त्यामुळं संबंधित स्टार्टअपचा फायदा होण्याऐवजी नुकसानच अधिक झालं. मानवी जाहिरात ही कल्पनाच 'अमानवी' असल्याची संतप्त प्रतिक्रिया बहुसंख्य लोकांनी दिली.

नवसंकल्पना मांडणं आणि त्या प्रत्यक्षात उतरवणं, हाही एक व्यवसाय आहे. 'मार्केटिंग स्ट्रॅटेजी' हा कॉर्पोरेट शब्द आता राजकीय पक्षांमध्येही रूढ झालाय. परंतु संकल्पना मांडताना त्याच्या परिणामांचा विचार संबंधिताला करावाच लागतो. आपल्या देशात 'स्वस्त मनुष्यबळ' उपलब्ध आहे, असं बोललं जातं. परिणामी, शोषणाचे दरवाजे नेहमीच खुले असतात.

''जाहिरात करणारी ही मुलं पाठीवर ओझं घेऊन किती अंतर चालणार, कुणास ठाऊक!'' अशी या फोटोवरील प्रतिक्रिया खूपच बोलकी आणि सुन्न करणारी आहे. खरंच, श्रम इतके स्वस्त झालेत? ◆◆◆

**ओ. पी. रावत,**
**माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त**



# आव्हानात्मक पाऊल

## कव्हर स्टोरी

गेल्या अनेक वर्षांपासून देशभरात चर्चा असलेल्या 'एक देश, एक निवडणूक' धोरणाला काही महिन्यांपूर्वी केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती. त्यानंतर यंदाच्या हिवाळी अधिवेशनाची सांगता होत असताना यासंदर्भातील विधेयक सरकारने लोकसभेत सादर केले आणि बहुमताने ते मंजूरही झाले आहे. केंद्र सरकारच्या या विधेयकाला आधार आहे तो राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली हे धोरण कितपत व्यवहार्य आहे, याचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीचा. या समितीने अनुकूल मत दर्शवत एक अहवाल सादर केला होता. या अहवालाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आणि आता यासंदर्भातील विधेयकही मंजूर झाले.

एक देश एक निवडणूक यासंदर्भातील आमचा मुद्दा मांडण्यासाठी मी आणि माजी मुख्य निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा कोविद समितीकडे गेलो होतो. वास्तविक, या समितीच्या स्थापनेतच चूक झालेली आहे. निवडणूक घेणाऱ्या निवडणूक आयोगाच्या विद्यमान किंवा माजी निवडणूक आयुक्तांचा या समितीत समावेश असायलाच हवा होता. पण तसे झाले नाही. असो, एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग पूर्णतः सक्षम आहे. २०१५ मध्ये मी निवडणूक आयोगात असतानाही सरकारने हेच विचारले होते. त्यावेळीही सरकारकडून सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्यात निवडणूक आयोगाला कोणतीही अडचण येणार नाही, असे आम्ही सांगितले होते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याचा प्रयोग आधी करावा, असे मी समितीसमोर सांगितले. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आपण एकाच वेळी किंवा काही दिवसांच्या अंतराने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या दिशेने वाटचाल करायला हवी. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे विलीनीकरण केल्यास निवडणुकीचे स्वरूप अधिक मोठे आणि व्यापक होईल. कारण आजमितीला देशात सात लाख पंचायती आहेत. बहुधा समितीनेही याची दखल घेतली आहे आणि लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर १०० दिवसांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची शिफारस केली आहे.

यामागचे मुख्य कारण म्हणजे, राज्यांचे निवडणूक आयुक्त हे बहुतेकदा केंद्रीय निवडणूक आयोगाप्रमाणे कठोर राहून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेत नाहीत. पंचायत निवडणुकीत मोठ्या प्रमाणात हाणामारी होते. बरेचदा संविधानाचे पालन होत नाही. तरीही राज्य निवडणूक आयुक्त हतबल दिसतात. याचे कारण त्यांची नियुक्ती मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादानेच झालेली असल्यामुळे ते योग्य काय अयोग्य ठरवण्याऐवजी वरिष्ठांना खुश करण्यात ते व्यस्त असतात. त्यांच्यावर सत्ताधारी पक्षाकडून नेहमीच दबाव असतो. अलीकडेच, न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित लोकांच्या एका कार्यक्रमात, मोठ्या संख्येने लोकांनी मला सांगितले की निवडणूक आयोगाने नागरी निवडणुका देखील घ्याव्यात. निःपक्षपातीपणा हा एकमेव मुद्दा नाही; राज्य सरकारे वेळेवर निवडणुका घेत नाहीत. महाराष्ट्रातील पंचायत निवडणुका वारंवार पुढे ढकलण्यात आल्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी सरकारला खडे बोल सुनावले होते आणि निवडणुका एका दिवसानेही लांबू नयेत, असा सज्जड दम भरला होता.

यानिमित्ताने एक रंजक प्रसंग सांगावासा वाटतो, ज्यावरुन राज्यांचे निवडणूक आयुक्त कोणत्या दबावाखाली काम करतात हे समजण्यास मदत होईल. मी देशाचा निवडणूक आयुक्त असताना मला माझ्याच राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा फोन आला आणि ते कठोरपणे म्हणाले की, तुम्ही आमचा पराभव करण्याचा ठेका घेतला आहे, त्यामुळेच शिवपुरीतील पोटनिवडणुकांसाठी हैदराबाद येथील एका अधिकाऱ्याची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यावर मी त्यांना सांगितले की, त्या पर्यवेक्षकाच्या निःपक्षपातीपणाबद्दल तुम्हाला शंका असेल तर आयोग पर्यवेक्षक बदलेल. यानंतर मी पश्चिम बंगालमधील अधिकाऱ्याला निरीक्षक म्हणून नियुक्त केले. त्यानंतरही या निवडणुकीत मुख्यमंत्र्यांच्या पक्षाचा पराभव झाला. खरे तर नवीन पर्यवेक्षक जुन्यापेक्षाही कडक होते. अशा प्रकारे निवडणुका घेतल्या जातात. निवडणूक घेणाऱ्याला केवळ संविधानाकडेच पाहावे लागते. वास्तविक, स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी राज्यांमध्ये प्रादेशिक निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करावी लागणार आहे. घटनेच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करून हे करता येणे शक्य आहे.

मूळ मुद्द्याकडे येऊया. लोकसभेत बहुमत असल्यामुळे 'वन नेशन, वन इलेक्शन'चे विधेयक मंजूर झाले असले तरी देशात एकत्रित निवडणुका घ्यायच्या का, घ्यायला हव्यात का, यावर साधकबाधक चर्चा झाली पाहिजे. यासाठी सरकारने सर्व पक्षांची संमती घ्यायला हवी आणि त्यांची मतेही समजून घेतली पाहिजेत. ही घाईगडबडीने करण्याची बाब नाही. सद्यस्थितीत देशाच्या राजकारणात महत्त्व असलेले १५ पक्ष 'वन नेशन वन इलेक्शन'ला सहमत नसल्याचे समोर येत आहे. या पक्षांची पर्वा न करता हा निर्णय राबवल्यास यामागील चांगल्या हेतूला नक्कीच धक्का बसेल. ही खूप खोलवरची गोष्ट आहे, जी कदाचित सध्या कोणालाच समजू शकत नाही.

येत्या काळात भारतात जनगणना सुरू होणार आहे. जनगणनेच्या आकडेवारीनंतर जागांचे परिसीमन देखील बदलेल. उत्तर भारतात जागांची संख्या जास्त वाढेल, तर दक्षिण भारतात जागा कमी वाढतील. त्यामुळे दक्षिण भारतातील पक्षांमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. आधीच सरकारचे नेतृत्व करणाऱ्या भाजपबद्दल असे म्हटले जाते की, त्यांचा प्रभाव फक्त उत्तर भारतात आहे. मला वाटते की जनगणनेनंतर (त्यानुसार २०२९ मध्ये निवडणुका होतील) जागांचे सीमांकन देशावर खूप परिणाम करेल. देशाची एकता आणि अखंडता जपण्याच्या दृष्टीकोनातूनही मी याकडे पाहतो. सोप्या भाषेत सांगायचे तर येणारा काळ देशासाठी आव्हानात्मक असणार आहे. त्यामुळे 'वन नेशन वन इलेक्शन'साठी सर्व पक्षांच्या सहमतीचा मी आग्रह धरत आहे.

आता प्रश्न उरतो तो या निर्णयाच्या अमलबजावणीसाठी निवडणूक आयोगाला काय तयारी करावी लागेल? सध्या निवडणुकीत २०-२२ लाख ईव्हीएमचा वापर केला जातो. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी ५० लाख ईव्हीएमची आवश्यकता असेल. त्यासाठी अंदाजे नऊ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. पूर्वी, ईव्हीएमचे आयुष्य १५ वर्षे होते. त्यामध्ये १० निवडणुका होत असत. आता त्याद्वारे फक्त तीनच निवडणुका घेता येणार आहेत. निवडणूक आयोगाच्या खर्चावर नजर टाकली तर जगातील सर्व निवडणुकांपेक्षा आपल्या निवडणुका स्वस्त आहेत. आम्ही सर्व निवडणूक व्यवस्थेवर प्रति मतदार फक्त एक डॉलर खर्च करतो. याउलट केनिया प्रति मतदार २५ डॉलर खर्च करतो. शेजारी देश पाकिस्तानचा खर्चही जास्त आहे. 'वन नेशन वन इलेक्शन'मध्ये विविध निवडणुकांचा विचार करता, मतदारांसाठी अनेक ईव्हीएमही बसवावी लागतील. त्यामुळे मतदारांचा भ्रमनिरास होईल, असे पक्षांचे म्हणणे आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसोबत नागरी निवडणुका घ्यायच्या नसल्याने फक्त दोनच ईव्हीएम बसवावी लागू शकतात. भारतात ओडिशाच्या निवडणुका अजूनही लोकसभेच्या निवडणुकांसोबतच होतात. तिथे दोन ईव्हीएम बसवले जातात. त्यानुसार सुरुवातीला विधानसभा व लोकसभेच्या निवडणुका सर्व राज्यांत एकत्रित घेऊन त्यातील अनुभवांनुसार सुधारणा करुन सर्व निवडणुका एकत्र घेण्याबाबतचे पाऊल टाकता येईल.

एकत्रित निवडणुकांमुळे प्रशासकीय खर्च कमी होणार असला तरी निवडणुकीत होणारा पैशांचा वापर कमी होईल, असे वाटत नाही. कारण अधेमधे निवडणुका नसल्याने राजकीय पक्ष एकाच निवडणुकीत जास्त पैसा खर्च करू शकतात. त्यामुळे राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर मर्यादा असल्याशिवाय निवडणूक खर्च कमी होणार नाही. पण या मुद्द्यावर राजकीय पक्षांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव आहे. प्रमुख पक्षांना यात काही स्वारस्य असल्याचे दिसत नाही. त्यामुळे एकत्रित निवडणुका ही एक मोठी निवडणूक सुधारणा असली तरी ती अंतिम नाही हे लक्षात घ्यायला हवे. ◆◆◆

**पं. हरीप्रसाद चौरासिया,**
**विश्वविख्यात बासरीवादक**

**उस्ताद झाकिर हुसेन यांच्यासारखे कलाकार दुर्मिळ असतात. संगीत क्षेत्राला नवी उंची आणि एक ओळख देणारे तबलावादक म्हणून त्यांची नोंद इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली आहे. मी, पंडित शिवकुमार शर्मा आणि उस्ताद झाकिर हुसेन या त्रिकुटावर संगीतरसिकांनी अपार प्रेम केले. झाकीर यांच्या तबलावादनाबाबत मी काही बोलण्याची गरज नाही, कारण तबल्यावर पडणारा त्यांचा हात, त्यातून उमटणारा नादमधुर झंकार आणि त्याने मंत्रमुग्ध होणारे, स्तीमित होणारे, समरसून जाणारे चाहते हा विलक्षण स्वर्गसोहळा देश-विदेशातील कार्यक्रमांमधून असंख्य वेळा पाहायला मिळाला आहे. झाकीर यांच्या कृतीत त्यांची अफाट विचारशक्ती आणि तितकीच प्रगल्भ आकलनक्षमता प्रतिबिंबित व्हायची. प्रत्येक गोष्ट अतिशय बारकाईने समजून घेऊन करणे हा त्यांचा मूलतः स्वभाव होता. इतक्या उंचीवर पोहोचूनही झाकीर सहकलाकारांना उत्साहाने प्रतिसाद देत असत.**



# दुर्मिळ उस्ताद

गेल्या पाच ते सहा दशकांपासून ज्यांच्या जादुई बोटांनी तबल्याचा नाद आसमंतात घुमला त्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी जगाचा निरोप घेतला, यावर अजूनही विश्वास बसत नाही. एवढ्या लहान वयात कोणी कसा जाऊ शकतो आणि तोही ज्याचा श्वास फक्त तबला, ताल आणि रागात होता ! त्यांच्या जाण्यामुळे भारतीय शास्त्रीय संगीताची मोठी हानी झाली आहे. उस्ताद झाकिर हे माझ्यासाठी केवळ तबला वादक किंवा संगीतकार नव्हते. ते माझे सहकारी होतेच पण त्याहीपेक्षा माझ्या कुटुबीयांतील एखाद्या सदस्यांपैकी एक होते. दीर्घकाळापासून माझा त्यांच्याशी स्नेह राहिला. अगदी सांगितिक आणि वैयक्तिक आयुष्यातही. लहान असल्यापासून ते आमची साथसंगत करत होते.

बालपणी झाकिर हे वडिल उस्ताद अल्ला रख्खा खान साहेब यांच्यासोबत माझ्याकडे येत असत. त्याकाळात अल्लारख्खा खान आणि मी सिनेसंगीतामध्ये काम करत होतो. तो काळ वेगळा होता. त्यावेळी अल्लारख्खासाहेब माझ्याकडे राहात असत. झाकीरही त्यांच्यासोबत राहायचा. त्याच्याकडे पाहून हा मुलगा भविष्यात जागतिक कीर्तीचा तबलावादक होईल आणि प्रचंड लोकप्रियता त्याच्या तबलावादनाला लाभेल, असा कुणी विचारही केला नव्हता. कालांतराने अल्लारख्खा खान साहेबांप्रमाणेच झाकिर हुसेनदेखील माझ्यासमवेत साथसंगत करू लागले.

तबला हे तालवाद्य अनेक वर्षे दुर्लक्षित राहिले. सोळाव्या शतकाच्या दरम्यान उत्तर भारतीय संगीतात त्याची स्वीकृती वाढू लागली. घराणा संगीताच्या प्रवर्तकांनी कथ्थकसारख्या नृत्यशैलीतील साथीसाठी तबल्याला योग्य मानले. पुढे तबला संगीताच्या शास्त्रीय शैलीमध्ये औपचारिकपणे स्वीकारला गेला. हळूहळू गायकाचा आवाज, सतारीचा स्वर, बासरीचा सूर आणि तबल्याचा नाद यामध्ये फरक करणं कठीण होऊन गेलं. यालाच तबल्याची जादू म्हणतात. तबल्याच्या या जादूमध्ये उस्ताद झाकीर हुसेन निपुण होते. झाकीर यांच्या तबलावादनाने गायकांच्या साथीचा एक वेगळा इतिहास तर निर्माण केलाच; पण एकल वादन म्हणूनही तबल्याला मुख्य प्रवाहात आणले. तबल्याच्या शास्त्राच्या रथावर स्वार झालेला हा महारथी संगीत आणि साथीच्या दुनियेत दिग्विजय बनला. हुसेन साहेबांनी तबलावादनातील बारकावे अभ्यासाने, निरीक्षणाने आत्मसात केले. झाकीर हुसेन यांनी तबल्याच्या फ्युजनवरही खूप काम केले. अमेरिकन जॅझमध्ये एकाच वेळी अनेक इलेक्ट्रॉनिक आणि आधुनिक वाद्यांच्या ध्वनींमुळे एक लहर निर्माण होते. पण हुसेन साहेबांना प्रत्येक तालानंतर एक जागारिकामी वाटली, जणू काही तिथे काहीच नाही, शून्यपोकळी.. ती जागा त्यांनी तबल्याच्या नादाने अतिशय बेमालूमपणे भरून नेली आणि त्यातून एक अद्भुत जुगलबंदी आकाराला आली.

झाकीर अतिशय लिलया पद्धतीने तबलावादन करत असत. माझ्या साथसंगतीत अनेक कलाकार असायचे. मात्र माझी अणि झाकिर हुसेनची जोडी ही प्रेक्षकांना खूप आवडली. गावांत, शहरांत, दिल्लीत, कोलकता येथे, अमेरिका, लंडनमध्ये, जगभरात प्रत्येक ठिकाणी आमचे कार्यक्रम झाले आणि गाजलेही ! आम्ही अनेकदा एकत्र राहिलो. कधी मी गाडी चालवायचो तर कधी झाकिर चालवायचे. एकत्र जेवण करायचो आणि एकत्रच सराव करायचो. व्यासपीठावरून उतरताच आम्ही मोटारीत बसायचो आणि दुसऱ्यां शहराकडे रवाना व्हायचो. एकेकाळी आम्ही खूप दौरे आणि कार्यक्रम केले. प्रामुख्याने आम्ही एका शहरातून दुसऱ्या शहरांत मोटारीतूनच जाणे पसंत करायचो. यामागचे कारण म्हणजे एकतर सहवास लाभायचा आणि विमानाचा खर्च देखील वाचायचा. त्यावेळी झाकीर यांच्यामध्ये असणारे तबल्याविषयीचे कुतुहल सदोदित जाणवायचे. त्यावरुन झाकीर तबला अक्षरशः जगला असे म्हणता येईल. त्याच्या वियोगाचे दुःख इतके प्रचंड आहे की किती आठवणींना उजाळा द्यायचा असा प्रश्न पडतो. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे झाकीर यांच्या तबलावादनाबाबत मी काही बोलण्याची गरज नाही. तबल्यावर पडणारा त्यांचा हात, त्यातून उमटणारा नादमधुर झंकार आणि त्याने मंत्रमुग्ध होणारे, स्तीमित होणारे, समरसून जाणारे चाहते हा विलक्षण स्वर्गसोहळा देश-विदेशातील कार्यक्रमांमधून असंख्य वेळा लोकांनी पाहिला आहे. त्यापलीकडे जाऊन वैयक्तिक आयुष्यातही तो तबल्यासारखाच उत्साही असायचा.

मी, पंडित शिवकुमार शर्मा आणि उस्ताद झाकिर हुसेन या त्रिकुटावर संगीतरसिकांनी अपार प्रेम केले. आयोजकांनीही आम्हाला मोठ्या प्रमाणावर संधी दिल्या. कधी आमचे तिघांचे एकत्र कार्यक्रम व्हायचे, तर कधी माझे आणि झाकिरचे तर कधी शिवकुमार आणि झाकिर यांचे. आम्हा सर्वांना खूप लोकप्रियता मिळाली. आम्ही एकत्रितपणे आल्बमही काढले. कलाकारांची मने एकमेकांशी जुळतात तेव्हा अशा गोष्टी घडतात.

झाकिर यांची आणखी एक गोष्ट मला खूप आवडायची. ते प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करायचे. त्यांच्या कृतीत त्यांची अफाट विचारशक्ती आणि तितकीच प्रगल्भ आकलनक्षमता प्रतिबिंबित व्हायची. ते संगीताविषयी काही बोलत असतील, साथ देत असतील, तबलावादन करत असतील तर ते प्रत्येक गोष्ट अतिशय बारकाईने समजून घेऊन करत. हा त्यांचा मूलतः स्वभाव होता. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, लोकप्रसिद्धीच्या, रसिकांच्या प्रेमाच्या, यशाच्या इतक्या उंचीवर पोहोचूनही झाकीर सहकलाकारांना उत्साहाने प्रतिसाद देत असत. तबलावादनाबाबत ते बोलत असतील, स्वत:बाबत काही गोष्टी सांगत असतील, कुटुंबाबाबत किंवा अन्य तबलावादकाविषयी बोलत असतील तर खूपच विचारपूर्वक मत मांडायचे. त्याच्या बोलण्यातील नम्रभाव विलक्षण अनुकरणीय होता. कलेचं सामर्थ्य केवळ सादरीकरणात नसतं. ती कला अंतरंगातून व्यक्तिमत्व समृद्ध करणारी असते. त्या कलेसाठीच्या समर्पणातून नम्रता, लीनता, सहृदयता हे गुणविशेष अंगी येतात. झाकीर हुसेन, अल्लारख्खासाब यांसारख्या कलावंतांकडे पाहिल्यानंतर याची पदोपदी प्रचिती येत असे. अगदी नव्यानं गायनाच्या क्षेत्रात आलेल्यांनाही झाकीरनी साथ दिली. पण ती देत असताना कुठेही आपले मोठेपण दाखवण्याचा दर्प त्यांच्यात दिसला नाही. उलट त्या नवोदिताला सांभाळून घेत त्यांनी साथ दिली. ही बाब कलाक्षेत्रातील सर्वांसाठीच अनुकरणीय आहे.

म्हणूनच मला वाटते की, उस्ताद झाकिर हुसेनसारखे कलाकार दुर्मिळ असतात. आपल्या अवीट, माधुर्यपूर्ण तबलावादनातून त्यानं रसिकांची मनेच जिंकली नाहीत तर त्यांच्या अंतरात्म्याला स्पर्श केला. वाद्यसंगीतातील या वाद्याची जादू किती अप्रतिम आहे हे साऱ्या जगाला दाखवून दिलं. हे त्यांचं योगदान ऐतिहासिक आहे. संगीत क्षेत्राला नवी उंची आणि एक ओळख देणारे तबलावादक म्हणून त्यांची नोंद इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली आहे. केवळ भारतातच नाही तर परदेशातही त्यांचा खूप मोठा चाहतावर्ग होता.

झाकीर हुसेन हे प्रयोगशील तबलावादक होते. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीमध्ये त्यांनी तबलावादनात अनेक प्रयोग केले. अगदी भारतीय संगीतकारांसोबत आणि परदेशी संगीतकारांसोबतही. काही काळापूर्वीच त्यांच्या अशाच अनोख्या प्रयोगात्मक संगीताला बहुचर्चित ग्रॅमी पुरस्काराने गौरविण्यात आले. बराच काळ एकत्र राहिल्याबद्दल मला मनस्वी आनंद आणि समाधान वाटते. त्याच्या सहवासाने, साथीने मला आत्मिक समाधान दिले. परंतु मला एक खंत नेहमी वाटत राहिल की त्यांच्या अस्वस्थेतेचे कारण शेवटपर्यंत समजले नाही. बऱ्याच काळापासू ते एका व्याधीचा सामना करत असूनही त्यांनी यासंदर्भात पुसटशी कल्पनाही मला दिली नाही. त्यांनी मला सांगायला हवे होते. भारतातील काही कार्यक्रम ते रद्द करत असल्याचे मला समजले होते. त्यांचे कुटुंब अमेरिकेत असल्याने तेथे राहण्याचा निर्णय योग्य होता. पण त्यांचे अशा प्रकारे जाणे क्लेषदायक आहे. आधी पंडित शिवकुमार शर्मा गेले आणि आता झाकिरनेही जगाचा निरोप घेतला..... ◆◆◆

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

# सिनेमॅटिक

*हिंदी चित्रपटसृष्टीच्या शंभराहून अधिक वर्षांच्या प्रवासात अनेक कलावंतांनी आपल्या अभिनयसामर्थ्याने रसिक प्रेक्षकांच्या मनावर प्रदीर्घ काळ अधिराज्य गाजवले. यामध्ये शोमन राज कपूर यांचा उल्लेख अग्रक्रमाने केला जातो. अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती अशा तिन्ही क्षेत्रामध्ये आपल्या प्रतिभेचा आणि दूरदृष्टीचा, संवेदनशीलतेचा ठसा उमटवणाऱ्या राज यांच्या चित्रपटांनी रसिकांचे केवळ मनोरंजन केले नाही, तर त्यांना अंतर्मुख होऊन विचार करण्यास भाग पाडले. आपल्या विलक्षण अभिनयक्षमतेनं आणि उत्कट हावभावांनी या महान कलाकरानं वस्तुपाठ घालून दिला.*




## लार्जर दॅन लाईफ

सिनेविशेष

**मानवेंद्र उपाध्याय**
सिनेसमीक्षक

शोमन राज कपूर म्हणजे भारतीय सिनेसृष्टीला पडलेलं सोनेरी स्वप्न. निळ्याशार डोळ्यांचा, विलक्षण प्रतिभा असणारा, दूरदृष्टी असणारा, संवेदनशील आणि अफाट अभिनयक्षमता, निर्मिती-दिग्दर्शनाचे कौशल्य असणारा जगावेगळा कलावंत. चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वात महान आणि प्रभावशाली अभिनेते, चित्रपट निर्माते असणाऱ्या राज कपूर यांनी आपल्या अभिनय कौशल्याने सर्व रसिक प्रेक्षकांना केवळ प्रभावितच केले नाही तर अंतर्मुखही केले आणि स्वप्नांच्या नव्या दुनियेची सफरही घडवून आणली. सिनेसृष्टीला त्यांनी दिलेलं योगदान अमूल्य आहे. यंदाचं वर्ष हे या शोमनच्या जन्मशताब्दीचं वर्ष आहे. अलीकडेच इफ्फी २०२४ च्या निमित्ताने राज कपूर यांचा नातू रणबीर याने आपल्या मुलाखतीत लाडक्या दादूंविषयी बोलताना अतिशय मार्मिक विवेचन केले. तो म्हणाला, राज कपूर यांचे चित्रपट सामाजिक समस्यांवर भाष्य करणारे होते तसेच सर्वसामान्यांच्या समस्यांचे निराकरण करणारेही ! 'आवारा'मध्ये जातीवादाचा मुद्दा मांडला गेला; तर 'श्री ४२०' मध्ये त्यांनी वंचितांच्या संघर्षावर लक्ष केंद्रित केले. 'राम तेरी गंगा मैली'मध्ये स्त्रीच्या व्यक्तिमत्वाच्या शुद्धतेचे आणि पवित्रतेचे दर्शन त्यांनी घडवले होते. ५० वर्षांपूर्वी बनलेल्या चित्रपटांमध्येही, राज कपूर यांनी जे कथानक मांडले ते आजच्या पिढीलाही प्रेरित करणारे आहे, तसेच वर्तमान समस्यांशी निगडीत आहे.

रणबीरने व्यक्त केलेले मनोगत अतिशय समर्पक आहे. राज कपूर यांनी आपल्या शानदार कारकिर्दीत 'बरसात', 'श्री ४२०', 'संगम', आवारा यांसारख्या एकाहून एक सरस चित्रपटांमधून त्यांनी बॉलिवूडपटांना खऱ्या अर्थाने सिनेमॅटिक चमक दिली. १९५१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आवारा' या चित्रपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड लोकप्रियता मिळवली होती.

राजसाहेबांवर चार्लीन चॅप्लीचा विलक्षण प्रभाव होता. त्याच्याच पावलावर पाऊल टाकत अभिनयामध्ये चेहऱ्यावरील हावभाव किती महत्त्वाचे असतात आणि त्यांच्या आधारे किती सार्थपणाने भावना व्यक्त करता येतात याचा वस्तुपाठच जणू राज कपूर यांनी घालून दिला. 'मेरा नाम जोकर' सारख्या चित्रपटातील त्यांची भूमिका असेल किंवा 'आवारा'मधील त्यांचा अभिनय असेल; प्रत्येक प्रसंगातील उत्कटता त्यांनी तितक्याच ताकदीने आपल्या हावभावातून मांडत प्रेक्षकांची मने जिंकली. 'दोस्त दोस्त ना रहा' हे गाणं पाहताना त्या व्यक्तिरेखेच्या मनातले भाव, त्याला झालेलं प्रेमभंगाचं दुःख, फसवलं गेल्याची भावना हे सारे मनपटलावरील तरंग त्यांनी अप्रतिमपणाने सादर केले.

१९३० च्या दशकात बालकलाकार म्हणून चित्रपटांमध्ये आपला प्रवास सुरू केला. पृथ्वीराज कपूर आणि रामसरणी देवी कपूर यांच्या सहा मुलांमध्ये राज हे सर्वांत थोरले. १९३५ मध्ये आलेल्या 'इन्कलाब' या हिंदी चित्रपटात ते पहिल्यांदा दिसले. त्यावेळी त्यांचे वय अवघे दहा वर्षे होते. १९४९ मध्ये आलेल्या 'नील कमल' मध्ये मधुबालासोबत मुख्य भूमिकेत झळकल्यानंतर त्यांना मोठा ब्रेक मिळाला. यानंतर मेहबूब खानच्या 'अंदाज' चित्रपटामध्ये दिलीप कुमार आणि नर्गिससोबत काम केले. अभिनेता म्हणून हा त्यांचा पहिला चित्रपट. निर्माता, दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून त्यांना पहिले यश 'बरसात' आणखी एका मोठ्या ब्लॉकबस्टरमध्ये मिळाले.



१९७० मध्य आलेल्या 'मेरा नाम जोकर' ची निर्मिती, दिग्दर्शन आणि अभिनय या तिन्हींची जबाबदारी त्यांनी लीलया पेलली. हा चित्रपट पूर्ण होण्यासाठी सहा वर्षांहून अधिक काळ लागला. त्यांचा मुलगा ऋषी कपूर याने या चित्रपटात त्यांच्या पात्राची तरुण आवृत्ती साकारून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. आरके स्टुडिओचा 'मेरा नाम जोकर' २४४ मिनिटांचा होता. दोन इंटरव्हल्सचा हा पहिलाच चित्रपट होता. बॉक्स ऑफिसवर अयशस्वी ठरला असला तरी, नंतर तो भारतीय चित्रपटसृष्टीद्वारे निर्मित सर्वात प्रतिष्ठित चित्रपटांपैकी एक बनला. आजही रसिक प्रेक्षकांच्या तो स्मरणात आहे. राज कपूर यांनी अनेक तंत्रज्ञांसोबत काम केल्यानंतर वयाच्या २४ व्या वर्षी १९४८ मध्ये आरके स्टुडिओची स्थापना केली.

अनेकांना कदाचित माहीत नसेल, पण राज कपूर यांचे खरे नाव रणबीर राज कपूर असे होते. किदार शर्मा दिग्दर्शित 'विषकन्या'च्या सेटवर क्लॅप-बॉय म्हणून त्यांनी करिअरची सुरुवात केली. आवारा हा तीन पिढ्यांना कास्ट करणारा पहिला चित्रपट होता. या चित्रपटात कपूरांच्या तीन पिढ्या - दिवाण बशेश्वरनाथ (राज कपूरचे आजोबा), पृथ्वीराज कपूर आणि राज कपूर झळकले. पुढील काळात रणधीर कपूरने 'आज और कल'मध्ये त्याची पुनरावृत्ती केली.

राज कपूर हे केवळ अभिनेता-दिग्दर्शक आणि निर्मातेच नव्हते तर त्या काळात सिनेमाच्या भविष्याचा वेध घेणारे महान कलावंत होते. राज कपूर यांच्याबद्दल असे म्हटले जाते की, हा अभिनेता कधीही बेडवर झोपला नाही. त्याला जमिनीवर झोपायला आवडायचं. हॉटेलमध्ये राहूनही तो जमिनीवर झोपायचा. यासाठी त्याला एकदा हॉटेल व्यवस्थापकाने ताकीद दिली होती आणि तसे न करण्यास मनाई केली होती. ती न ऐकल्याबद्दल हॉटेल व्यवस्थापकाने त्याच्यावर दंडही ठोठावला आणि त्याच्या सवयीमुळे तो पाच दिवस दंड भरत राहिला.

आणखी एक किस्सा सांगितला जातो. राज कपूर आणि त्यांची पत्नी कृष्णा हे दोघे दादा बिमल रॉय यांच्या 'दो बिघा जमीन'च्या प्रीमियममध्ये पोहोचले होते. चित्रपट सुरू झाला आणि राज प्रचंड अस्वस्थ झाले. त्यांच्या डोळ्यात अश्रू होते. चित्रपट संपल्यानंतर ते घरी परतताना पूर्ण शांत होते. घरी आल्यानंतरही त्यांची अस्वस्थता दूर झाली नाही. जेव्हा कृष्णा कपूरने कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा राजसाहेब अश्रूभरल्या डोळ्यांनी म्हणाले की, कृष्णा, मी कोणत्या प्रकारचे चित्रपट बनवत आहे? ज्यात फक्त नायिकेच्याभोवती नृत्य आहे. आपण काल पाहिला तो खरा सिनेमा ! जो चित्रपट समाजाला नवी दिशा देतो, समाजाचे वास्तव मांडतो तो खरा चित्रपट. असे चित्रपट बनवल्याशिवाय मला शांती मिळणार नाही. व्लादिमीर वायसोत्स्की यांच्या रशियन गाण्यात राज कपूर यांचे वर्णन भारतीय संस्कृतीचे सर्वात प्रसिद्ध प्रतीक म्हणून केले गेले आहे. सिनेमा हा समाजाचा आरसा असतो, असं म्हणतात. राजसाहेबांच्या चित्रपटांनी ही बाब सिद्ध केली. राज कपूर यांचा संपूर्ण जीवनप्रवास पाहिल्यास हा कलाकार पूर्णतः सिनेमामय होता. ते सदैव सीन आणि कॅमेरा यांचा विचार करत असत. राज कपूर यांनी आपल्या आयुष्याच्या घटनांवर अनेक पटकथा लिहिल्या आणि चित्रपटासारखे 'लार्जर दॅन लाइफ' आयुष्यदेखील जगले. ◆◆◆

## मुकेशचा कपिलवर निशाणा

ज्येष्ठ अभिनेते मुकेश खन्ना आपल्या स्पष्ट वक्तेपणामुळे नेहमीच चर्चेत असतात. अनेकदा त्यांच्या विधानामुळे त्यांच्यावर टीका देखील केली जाते. नुकतेच एका मुलाखतीत त्यांनी कॉमेडियन कपिल शर्माच्या शोवर निशाणा साधला. मुकेश खन्ना यांनी कपिलच्या शोला अश्लील म्हटले आहे. तसेच कपिल शर्माच्या शोमध्ये जाण्यासाठी मला कधीही निमंत्रण आले नाही आणि त्याने संपर्क केला असता तरी मी नकार दिला असता, असे मुकेश खन्ना म्हणाले आहेत. मुकेश खन्ना यांनी म्हंटले की, कपिल शर्माला काय अडचण होती जे त्याने कधी माझ्याशी संपर्क केला नाही, कदाचीत याला अहंकार म्हणता येईल. एकदा कपिलने शोमध्ये



महाभारताच्या कलाकारांना बोलावलं होतं पण मला बोलावलं नव्हतं. मी ही आधीच ठरवलं होतं कि या शोमध्ये मी जाणार नाही. या शोमध्ये मला अश्लीलता दिसते. यातील बरेचसे संवादही डबल मिनींग असतात. मला त्याच्या शोमध्ये सभ्यता दिसत नाही. म्हणूनच मी या शोमध्ये सहभागी होणार नसल्याचे सांगितले, असा खुलासा मुकेश खन्ना यांनी केला. ते पुढे म्हणाले, मी या शोचा एक प्रोमो पहिला होता ज्यात रामायण मालिकेची टीम सहभागी झाली होती. अरुण गोविल यांनीही हजेरी लावली होती. त्यावेळी तो अरुण गोविल यांना म्हणाला कि,सर तुम्ही बीचवर अंघोळ करत आहात आणि तेव्हाच तिथे लोकांची गर्दी जमली आणि ते ओरडले की बघा, राम सुद्धा वीआयपी अंडरवेअर घालतात. या जोकवर अरुण गोविल हसून शांत राहिले. मी असतो तर मला सहन झालं नसतं. तुम्ही कोणाला काय विचारत आहात याचं भान असू नये का? ज्याने श्रीरामाचा आदर केला नाही तो भीष्म पितामहांचा काय करेल ? त्याचवेळी मी ठरवलं की या शोमध्ये जाणार नाही. मुकेश खन्ना यांनी एका अवॉर्ड फंक्शनमधील किस्साही यावेळी सांगितला. कपिल शर्मा त्यांच्या बाजूला १० मिनिटे बसला होता पण तो एका शब्दानेही बोलला नाही. इंडस्ट्रीत डिसेप्लीन खूप महत्त्वाचे आहे. कपिल चांगला विनोदी अभिनेता आहे, पण त्याच्यात खूप अहंकार आहे, असे म्हणत त्यांनी कपिल शर्मावर निशाणा साधला. ◆◆◆



## संजूबाबा नव्या व्यवसायात

बॉलीवूड अभिनेता संजय दत्त लवकरच 'बागी ४' चित्रपटात पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वीच त्याच्या या चित्रपटातील खतरनाक लुक रिलीज करण्यात आला. यातील त्याच्या लुकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर आता संजय दत्तने नवीन व्यवसायाला सुरुवात केली आहे. संजय दत्त व त्याची पत्नी मान्यता दत्त यांनी मिळून दुबईत नवीन रेस्टॉरंट सुरू केले आहे. त्यांच्या हॉटेलचं नाव 'दत्तफ्रॅन्कटी' आहे.त्याने स्वतः याबद्दल पोस्ट करत माहिती दिली आहे.

संजय दत्तचे सोशल मीडियावर व्यवसायाशी संबंधित काही व्हिडिओही शेअर केले आहेत. त्याने दुबई फूड डिलिव्हरी ॲपला देखील टॅग केले आहे. दुबईमध्ये राहणारे लोक या ॲपच्या मदतीने संजय दत्तच्या नवीन रेस्टॉरंटमधून तेथील पदार्थ ऑर्डर करू शकतात. संजय दत्तच्या या पोस्टनंतर त्याच्यावर चाहत्यांसह कलाकारांकडून अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. अभिनेता सलमान खान देखील इंस्टाग्राम अकाउंटवर संजय दत्तचा व्हिडिओ शेअर करत लिहिले आहे की, बाबासारखं कोणालाच नाही जमणार, मग तो ठेश्रश असो वा ठेश्रश्री. दरम्यान, संजय दत्त आणि सलमान खान चांगले मित्र आहेत. ◆◆◆




## हॉलिवूडच्या ऑफर का नाकारल्या ?

अभिनेत्री श्रद्धा कपूरने अल्पावधीत सिनेइंडस्ट्रीत स्वतःची एक खास ओळख निर्माण केली आहे. 'आशिकी २' पासून तिने आपल्या प्रवासाला सुरुवात केल्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. तिचा हा चित्रपट सुपरहिट झाल्यानंतर तिने अनेक चित्रपटांमध्ये काम केले.

अलीकडेच प्रदर्शित झालेला तिचा 'स्त्री २' चित्रपट देखील सुपरहिट ठरला. आज बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये तिचे नाव घेतले जाते. मात्र तिला हॉलिवूडमध्ये ऑफर मिळाल्या होत्या. परंतु तिने त्यास नकार दिला असल्याचा खुलासा एका कार्यक्रमात केला आहे.

एका कार्यक्रमात हॉलिवूडमध्ये काम करण्यासंदर्भातील प्रश्न विचारल्यावर ती म्हणाली, मला काही हॉलिवूड ऑफर्स आल्या होत्या. पण त्या मला फारशा आवडल्या नाहीत. माझ्यासाठी एखादी भूमिका किंवा कथा उत्साहपूर्ण असली पाहिजे, तेव्हाच मी ती स्वीकारते. सध्या भारतीय सिनेमाचा जो काळ सुरु आहे तो खूप एक्सायटिंग आहे. इतके ओटीटी प्लॅटफॉर्म्स आता आले आहेत. खूप विस्तार होत आहे. मला खरंच असं वाटतं की मला शाहरुख खानसारखं बनायचं आहे. आपल्या सिनेमांचं मार्केट तिकडे घेऊन जायचं आहे. आपले सिनेमे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे अशी माझी इच्छा आहे.

'स्त्री २' च्या यशावर श्रद्धा म्हणाली, माझा आधीपासूनच विश्वास होता की 'स्त्री २' ब्लॉकबस्टर ठरेल. म्हणून मी त्या दरम्यान कोणताही दुसरा प्रोजेक्ट साईन केला नाही. मला या सिनेमावर पूर्ण विश्वास होता. नुकतंच श्रद्धाने सौदीमध्ये झालेल्या रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये हजेरी लावली. यावेळी तिची भेट 'स्पायडरमॅन' फेम अँड्र्यू गार्फिल्डसोबत झाली होती. दरम्यानम श्रद्धाच्या 'स्त्री २' चित्रपटाने जगभरात कोट्यवधींचा गल्ला जमवला. या चित्रपटाने जगभरात ८५७ कोटी रुपयांचं कलेक्शन केलं. या चित्रपटामुळे अभिनेत्री श्रद्धा कपूरची प्रसिद्धीही वाढली असून तिला अनेक चित्रपटांसाठी ऑफरही मिळत आहे. ◆◆◆



## मृणाल झळकणार प्रभाससोबत

दिग्दर्शक संदीप रेड्डी वंगा यांच्या 'कबीर सिंग' आणि 'ॲनिमल' या दोन्ही चित्रपटांना मोठा प्रतिसाद मिळाला. या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली. या चित्रपटाच्या यशानंतर संदीप रेड्डी वंगा आणखी एक मोठा चित्रपट



'स्पिरिट' बनवण्याच्या तयारीत आहे.

या चित्रपटात प्रभास एका पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात एक मराठमोळी अभिनेत्री प्रभाससोबत स्क्रीन शेअर करणार आहे. 'स्पिरिट'ची टीम सध्या या चित्रपटासाठी प्री-प्रॉडक्शन आणि कास्टिंग करत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, दिग्दर्शक संदीप रेड्डी वंगा आणि निर्माते भूषण कुमार या ॲक्शन चित्रपटाच्या मुख्य भूमिकेसाठी अभिनेत्री मृणाल ठाकूरशी चर्चा करत आहेत.

याशिवाय यात करीना कपूर खान आणि सैफ अली खान देखील दिसणार असल्याचे वृत्त समोर येत आहे. या चित्रपटात दोघेही नकारात्मक भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. पहिल्यांदाच खऱ्या आयुष्यातले जोडपे एका हिंदी चित्रपटात निगेटिव्ह भूमिका साकारणार आहेत. त्यामुळे चाहत्यांमध्ये या चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे.

या चित्रपटातही हर्षवर्धन रामेश्वर संगीत देत आहे, ज्याने 'ॲनिमल'मध्ये संगीत दिले होते. 'स्पिरिट'ची निर्मिती भद्रकाली पिक्चर्स आणि टी-सीरीज संयुक्तपणे करत आहे. 'स्पिरिट' २०२६ मध्ये रिलीज होण्याची शक्यता आहे. याशिवाय संदीप रेड्डी वंगा रणबीर कपूरसोबत 'ॲनिमल पार्क' चित्रपटावर देखील काम करत आहेत. ◆◆◆

## 'मस्ती'चा पुढचा सिक्वेल




अभिनेता विवेक ओबेरॉय, रितेश देशमुख आणि आफताब शिवदासनी यांची मुख्य भूमिका असलेला 'मस्ती' हा चित्रपट प्रचंड गाजला होता. 'मस्ती'च्या यशानंतर 'ग्रँड मस्ती', 'ग्रेट ग्रँड मस्ती' असे सीक्वेलही प्रेक्षकांच्या भेटीला आले. त्यानंतर 'मस्ती' चित्रपटाच्या चौथ्या भागाची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. याचा एक व्हिडिओ विवेक ओबेरॉयने सोशल मीडियावर शेअर केला आहे. आफताब शिवदासिनी, विवेक ओबेरॉय आणि रितेश देशमुख यांची मस्ती पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. विवेक ओबेरॉयने 'मस्ती-४' च्या सेटवरील फोटो शेअर करत लिहिले, 'मस्ती-४' आता एक प्रेमकथा असून 'ब्रोमान्स' सुरू झाला आहे. पहिल्या चित्रपटानंतर २० वर्षांचा वेडपणा! माफ करा, मी लॉन्चिंला येऊ शकलो नाही. लवकरच शूटिंगला भेटू. त्याचबरोबर अभिनेता आफताब शिवदासनीने सुद्धा सोशल मीडियावर 'मस्ती-४' च्या सेटवरील काही फोटो शेअर केले आहेत. ◆◆◆

## छप्परफाड कमाई

'पुष्पा २: द रुल' चित्रपट या वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेला चित्रपट आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. सुरुवातीच्या दिवसापासून आतापर्यंत त्याने कमाईच्या बाबतीत अनेक विक्रम केले आहेत.

सुमारे ५०० कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने चार दिवसांत आपल्या बजेटपेक्षा जास्त व्यवसाय केला आहे. एवढेच नाही तर ५०० कोटींच्या क्लबमध्ये सर्वात जलद प्रवेश करणारा हा भारतीय चित्रपट ठरला आहे. यानंतर आता 'पुष्पा २: द रुल'ने रिलीजच्या ११व्या दिवशी म्हणजेच दुसऱ्या रविवारी देखील मोठे कलेक्शन केले आहे. या चित्रपटाने पहिल्या आठवड्यात ७२५ कोटी ८ लाखांची कोटींची कमाई केली आहे. ९व्या दिवशी चित्रपटाने ३६ कोटी ४ लाखांची कमाई केली, तर १०व्या दिवशी 'पुष्पा २: द रुल'चं कलेक्शन ६३.३ कोटी रुपये होतं.

सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, 'पुष्पा २: द रुल' ने रिलीजच्या ११व्या दिवशी म्हणजेच दुसऱ्या रविवारी ७५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. यासह, 'पुष्पा २: द रुल'चे ११ दिवसांचं एकूण कलेक्शन आता ९०० कोटींवर पोहोचलं आहे. यामध्ये चित्रपटाने रिलीजच्या ११ दिवसांत तेलगूमध्ये २७९.३५ कोटी रुपये, हिंदीमध्ये ५५३.१ कोटी रुपये, तामिळमध्ये ४८.१ कोटी रुपये, कन्नडमध्ये ६.५५ कोटी रुपये आणि मल्याळममध्ये १३.४ कोटी रुपयांची कमाई केली आहे.

या चित्रपटाने रिलीजच्या ११ दिवसांत विक्रमी ९००.५ कोटींची कमाई करून इतिहास रचला आहे. सुकुमार दिग्दर्शित या चित्रपटाने यशच्या ब्लॉकबस्टर चित्रपट 'केजीएफ चॅप्टर २' च्या कलेक्शनचा विक्रम मोडीत काढला आहे. भारतात 'KGF २' चे लाइफटाईम कलेक्शन ८५९.७ कोटी रुपये होते. त्यामुळे 'पुष्पा २: द रुल' हा देशातील सर्वाधिक कमाई करणारा दुसरा चित्रपट ठरला आहे. ◆◆◆

## जैसलमेरमध्ये जीएसटी कौन्सिलची बैठक संपन्न

# आरोग्य-टर्म इन्शुरन्स स्वस्त होणार नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आरोग्य आणि मुदतीच्या विम्यावरील जीएसटीमध्ये सध्या कोणतीही कपात होणार नाही. आयुर्विमा आणि आरोग्य विम्यावरील जीएसटी कमी करण्याचा प्रस्ताव पुढील बैठकीपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत टर्म इन्शुरन्स, लाइफ इन्शुरन्स आणि हेल्थ इन्शुरन्सवरील कर कमी करण्याचा प्रस्ताव राज्यांच्या विरोधामुळे पुढे ढकलण्यात आला आहे. परिषदेने मंत्र्यांना याचा अधिक अभ्यास करण्यास सांगितले आहे.

शनिवारी सकाळी ११ वाजल्यापासून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली जीएसटी परिषदेची ५५ वी बैठक जैसलमेरमध्ये सुरू आहे. बिहारचे अर्थमंत्री सम्राट चौधरी म्हणाले- विम्यावरील जीएसटी कमी




करण्याचा प्रस्ताव पुढील बैठकीपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. ही बैठक दोन टप्प्यात होत आहे.

पहिल्या टप्प्यातील सभा सकाळी ११ ते दुपारी २.४५ वाजेपर्यंत चालणार आहे. यानंतर दुपारी साडेचार वाजल्यापासून दुसऱ्या टप्प्यातील सभा सुरू होईल. या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासह गोवा, हरियाणा, जम्मू-काश्मीर, मेघालय आणि ओडिशा या राज्यांचे मुख्यमंत्री, अरुणाचल प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तेलंगणाचे उपमुख्यमंत्री, विभागांचे सचिव उपस्थित होते. आर्थिक व्यवहार आणि खर्च आणि वित्त मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी देखील सहभागी झाले आहेत. या बैठकीत अनेक वस्तूंवरील जीएसटी दर बदलण्याबाबत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. मंत्री गटाच्या शिफारशींच्या आधारे काही वस्तूंवरील जीएसटी कमी केला जाईल, तर चैनीच्या वस्तूंवरील कर वाढण्याची शक्यता आहे.

छोट्या पेट्रोल आणि डिझेल गाड्यांवर जीएसटी वाढण्याची शक्यता जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत छोट्या पेट्रोल आणि डिझेल कारवरील जीएसटी (१२ ते १८% पर्यंत) वाढवण्याचा प्रस्ताव येण्याची शक्यता आहे. जुन्या आणि सेकंड हँड वाहनांवरील जीएसटी दर ६% पर्यंत वाढवणे निश्चित मानले जात आहे. सध्या जुन्या वापरलेल्या वाहनांवर १२% जीएसटी आहे, तो आता १८% पर्यंत वाढवला जाऊ शकतो.

गुटखा आणि सिगारेटसह सर्व प्रकारच्या तंबाखू उत्पादनांवरील कर दर वाढवण्याची शिफारस मंत्री गटाने केली आहे. तंबाखूजन्य पदार्थांवरील कराचे दर २८ वरून ३५ टक्के करण्याची सूचना आहे. त्याचा प्रस्ताव जीएसटी कौन्सिलमध्ये ठेवला जाईल.

यावरील जीएसटी वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय ब्रँडेड शूज आणि घड्याळे अधिक महाग होतील. जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत १५ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या ब्रँडेड शूज आणि २५ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या घड्याळांवर कर वाढवण्यास मंजुरी मिळणे निश्चित मानले जात आहे. १५,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या शूजवर १८% वरून २८% जीएसटी वाढवण्याचा आणि २५,००० पेक्षा जास्त किमतीच्या घड्याळांवर २८% जीएसटी लावण्याचा प्रस्ताव आहे.

### अन्न ऑर्डर करणे स्वस्त

● बाटलीबंद पाणी, नोटबुक, सायकलवरील जीएसटी दर १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्याचा प्रस्ताव बाटलीबंद पाणी, नोटबुक आणि १०,००० रुपयांपेक्षा कमी किमतीच्या सायकलींवर जीएसटी १८% वरून ५% कमी करण्याचा प्रस्ताव आहे. ऑनलाइन अन्न ऑर्डर करणे स्वस्त असू शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत ऑनलाइन खाद्यपदार्थ वितरणावरील कर १८ टक्क्यांवरून ५ टक्के केला जाण्याची शक्यता आहे. यामुळे ऑनलाइन अन्न ऑर्डर करणे स्वस्त होईल. ऑनलाइन फूड डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्यांनाही याचा फायदा होणार आहे.

# भारतीय हवाई दलात भरती, ७ जानेवारीपासून नोंदणी प्रक्रिया सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलात भरती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी आनंदाची बातमी आहे. भारतीय हवाई दलाने अग्निवीर आयएनटी ०१/२०२६ साठी अधिसूचना जारी केली आहे. अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी agnipathvayu.cdac.in अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.


अर्ज करण्याची प्रक्रिया ७ जानेवारी २०२५ पासून सुरू होईल आणि अर्ज करण्याची शेवटची तारीख २७ जानेवारी २०२५ आहे. या भरतीसाठी उमेदवारांची निवड लेखी परीक्षा, शारीरिक, कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय चाचणीद्वारे केली जाईल.भारतीय हवाई दल अग्निवीर भरतीसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवार गणित, भौतिकशास्त्र आणि इंग्रजी विषयांसह किमान ५० टक्के गुणांसह मान्यताप्राप्त बोर्डातून दहावी किंवा बरावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

उमेदवाराकडे किमान ५० टक्के गुणांसह तीन वर्षांचा अभियांत्रिकी पदविका (मेकॅनिकल/ इलेक्ट्रिकल/ इलेक्ट्रॉनिक्स/ ऑटोमोबाइल/ कॉम्प्युटर सायन्स/ इन्स्ट्रुमेंटेशन टेक्नॉलॉजी/ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) असावा. इतर शाखेतील उमेदवारही अर्ज करू शकतात. उमेदवाराला १०+२ मध्ये किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे आणि इंग्रजी विषयात ही ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. याशिवाय, किमान ५० टक्के उत्तीर्ण गुणांसह दोन वर्षांचा व्होकेशनल कोर्स केलेला असावा.

### पात्रता निकष

● या पदासाठी अर्ज करण्याची शैक्षणिक पात्रता खालीलप्रमाणे तपासता येईल. अर्ज करण्यासाठी उमेदवारांची किमान वयोमर्यादा १७.५ वर्षे आणि कमाल वयोमर्यादा २१ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००५ ते १ जुलै २००८ दरम्यान झालेला असावा. उमेदवार निवड प्रक्रियेचे सर्व टप्पे पार करत असेल तर नावनोंदणीच्या तारखेपर्यंत कमाल वयोमर्यादा २१ वर्षे असावी. महिला आणि पुरुष उमेदवारांची उंची १५२ सेंटीमीटर असावी. ईशान्य भारत, उत्तराखंड आणि लक्षद्वीपमधील उमेदवारांना लांबीत सूट देण्यात येणार आहे.

### महत्वाच्या तारखा



● अर्ज सुरू होण्याची तारीख : ७ जानेवारी २०२५

● अर्ज करण्याची शेवटची तारीख : २७ जानेवारी २०२५

● ऑनलाइन परीक्षेच्या तारखा : २२ मार्च २०२५ पासून

# बीड, परभणीच्या प्रश्नावर सरकारची भूमिका बोटचेपी : नाना पटोले

**नागपूर :** - बीड आणि परभणीतील घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत, सरकारने गुंडगिरी पोसल्याचे परिणाम बीडमध्येही दिसले. बीड, परभणीच्या प्रश्नावर सरकारने बोटचेपी भूमिका घेतली आहे. पोलीस आणि बीडच्या गुंडाला सरकारचे अभय आहे", असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनानंतर प्रसारमाध्यमांशी चर्चा करताना केला. हिवाळी अधिवेशनाचे सुप वाजल्यानंतर महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले यांनी सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, बीड व परभणीतील घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत, सरकारने गुंडगिरी पोसल्याचे परिणाम बीडमध्येही दिसले. पोलिसांमध्येही गुंडाराज आले आहे का? असा प्रश्न पडतो. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन केले, त्यात अनेकांना जबर मारहाण केली, सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस मारहाणीत झाला पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांचा बचाव केला. परभणी प्रकरणात फक्त एका पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली.

निष्णात वकिलाप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी बीड प्रकरणात एका मंत्र्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आपली खुर्ची वाचवण्यासाठी मित्रपक्षांच्या मंत्र्यांना घाबरतात असे दिसते, असा टोला नाना पटोले यांनी लगावला.

ते पुढे म्हणाले की, विदर्भ व मराठवाड्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी हिवाळी अधिवेशनात चर्चा होणे अपेक्षित होते पण अशी कोणतीच चर्चा झाली नाही. मविआ सरकार असताना याच अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती पण भाजपा युती सरकारने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन देऊनही कर्जमाफीची घोषणा केली नाही.

## Selected

### आता जमिनीची मोजणी होणार जलद; मोजणी शुल्कात वाढ

**मुंबई :** राज्य सरकारने जमीन मोजणी शुल्कात १४ वर्षांनंतर वाढ केली आहे. यापुढे चारऐवजी केवळ दोन प्रकारातच शुल्क आकारणी केली जाणार आहे. २७ सप्टेंबर रोजी निघालेल्या या आदेशाची एक डिसेंबरपासून अंमलबजावणी सुरू झाली असून यामुळे जमीन मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता येऊन वेगाने सेवा मिळणार आहे. राज्यात २०१० नंतर प्रथमच जमीन मोजणी शुल्कात वाढ करण्यात आली आहे. प्रशासकीय खर्चात वाढ झाल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. पूर्वी साधी, तातडी, अतितातडी व अतिअतितातडी अशा चार प्रकारात मोजणी केली जायची आणि त्या प्रकारानुसार शुल्क आकारले जात होते. मात्र, मोजणीच्या अनेक प्रकारांमुळे जमीनधारकांत संभ्रमाची स्थिती होती. त्यामुळे जमीन मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेगवान सेवेसाठी आता चारऐवजी फक्त दोन प्रकारातच मोजणी होणार आहे. त्यानुसार शुल्क आकारणी केली जात आहे.

### साहित्य संमेलनात सावरकरांकडे दुर्लक्ष : सावरकर प्रेमींची खंत

**पुणे :** दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात स्वातंत्र्यवीर वि दा सावरकर यांना पूर्ण दुर्लक्षित करण्यात आले आहे. मराठी साहित्यात योगदान देणाऱ्या या महाकवीचा कुठेही उल्लेख नसावा हे दुर्दैवी आहे , अशी खंत सावरकर प्रेमींनी व्यक्त केली आहे. सरहदचे संजय नहार यांच्याकडे देखील काही मंडळींनी आपली तक्रार नोंदवली . मात्र नहार यांनी साहित्य महामंडळाकडे बोट दाखवून हा संपूर्ण अधिकार महामंडळाचा आहे , असे सांगितल्याचे सावरकर प्रेमी व्यक्ती आणि मंडळांनी सांगितले. श्रीकांत ताम्हणकर यांनी याबाबत सरहदीचे संजय नहार यांच्याशी चर्चा केली . ताम्हणकर यांनी एक लेखी पत्र माध्यमांना दिले असून त्यामध्ये त्यांनी या संपूर्ण प्रकाराबद्दल खंत व्यक्त केली आहे. मराठी साहित्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सावरकर यांचे नाव कुठेही नाही ही एक प्रकारची अवहेलना असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच ज्यांचे साहित्यात योगदान नाही अशांचाही काहींच्या नावाने येथे काही मंडप आणि प्रवेशद्वार आहेत , परंतु सावरकर यांना टाळणे जाणे हे चुकीचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

### भारताच्या माजी क्रिकेटपटू विरोधात अटक वॉरंट

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) योगदानामध्ये फसवणूक केल्याच्या आरोपावरून भारताचा माजी सलामीवीर रॉबिन उथप्पाविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. हे वॉरंट, कथितपणे कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा न केलेल्या २३.३६ लाख रुपयांच्या रकमेशी संबंधित आहे. रॉबिन उथप्पा सेंटॉरस लाइफस्टाइल ब्रँड्स प्रायव्हेट लिमिटेडचा संचालक त्यावेळचे हे प्रकरण आहे. हे अटक वॉरंट प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त शदक्षारा गोपाल रेड्डी यांनी जारी केले आहे.कर्नाटकातील पुलकेशीनगर पोलिसांना या अटक वॉरंटची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते, परंतु पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, उथप्पा त्याच्या निवासस्थानी सापडला नाही. हे प्रकरण ईपीएफ निधीबाबतच्या त्याच्या कथित भूमिकेवर केंद्रित आहे. उथप्पा विरोधातील अटक वॉरंट, सुरुवातीला ४ डिसेंबर रोजी अंमलात आणण्यात आले होते, पण तपास सुरू असल्याने त्याचीअंमलबजाणी करण्यात आली नव्हती.

## ...पण इथे पुस्तक वाचायला बोलावले- गौतमी पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नेहमी डान्स फ्लोअरवर थिरकणारी प्रसिद्ध डीजे डान्सर गौतमी पाटील एका वेगळ्या भूमिकेत दिसली. पुणे पुस्तक महोत्सवाला हजेरी लावत तिने वाचनाची प्रेरणा घेतली आणि पुस्तक वाचनाची सुरुवात करण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी गौतमी म्हणाली, "मला इतर ठिकाणी नाचायला बोलावतात, पण इथे पुस्तक वाचायला बोलावलं गेलं आहे, याचं मला खूप अप्रूप वाटतंय. पुण्यात एवढा मोठा पुस्तक महोत्सव भरतो हे मला आज समजलं. आता यापुढे मोकळ्या वेळेत नक्कीच पुस्तक वाचायला सुरुवात करेन असे सांगितले.

## अभिवादन...

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**नागपूर :** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूर येथील दीक्षाभूमीला भेट दिली. यावेळी त्यांनी भगवान गौतम बुद्धांना विनम्रतापूर्वक वंदन केले. तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला विनम्र अभिवादन केले.

# महाराष्ट्रात थंडीची लाट कायम; १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमानाची नोंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील तापमानात सातत्याने बदल होत असल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यातील तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा खाली गेले आहे. येत्या काही दिवसांत राज्यातील तापमानात किंचित बदल होण्याची शक्यता आहे.

मात्र, थंडी कायम राहणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली. वाढत्या थंडीमुळे आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात येत्या २४ डिसेंबरपर्यंत थंडीची लाट कायम असणार आहे. मात्र, त्यानंतर २५ डिसेंबर ते २९ डिसेंबरपर्यंत राज्यातील तापमान वाढ होईल आणि त्यानंतर पुन्हा एकदा थंडीला सुरुवात होईल.

राज्यात परभणी, निफाड, जेऊन, अहिल्यानगर आणि नांदेडमध्ये सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली. महाराष्ट्रात धुळे, परभणी, निफाड, जेऊर, अहिल्यानगर, नांदेड, नाशिक, पुणे, बीड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर गोंदिया, भंडारा आणि वर्धा या ठिकाणी तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी नोंदवण्यात आले.




### तापमान

● पुणे ३२.२ (१२.५), अहिल्यानगर (९.७), धुळे ३०.५ (७), जळगाव २९.६ (९.५), जेऊर ३३ (११), कोल्हापूर ३०.१ (१७.६), महाबळेश्वर २७.२ (१२.२), मालेगाव २७.७ (१२.२), नाशिक ३१.२ (१०.७), निफाड २९.८ (८४), सांगली ३१.४ (१७), सातारा ३१.७ (१४.६), सोलापूर ३४ (१७.४), सांताक्रूझ ३१.४ (१८.५), डहाणू २९.३ (१६.१), रत्नागिरी ३३.८ (१९.६), छत्रपती संभाजीनगर ३०.५ (१२.४), बीड २९ (-), धाराशिव ३०.३ (१२.२), परभणी ३०.९ (१४.५), परभणी कृषी विद्यापीठ २९ (१२.४), अकोला ३०.३ (१२.८), अमरावती ३१.४ (१५.१), भंडारा २८ (१४), बुलडाणा ३१ (१३.४), ब्रह्मपुरी ३३.६ (१३.१), चंद्रपूर २९.४ (-), गडचिरोली ३० (१५.४), गोंदिया २९.८ (१६.६), नागपूर ३०.२ (१६.१), वर्धा ३०.१ (१६.२), वाशीम २९.६ (१५), यवतमाळ ३०.५ (-).

# दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी 'आप'ला मोठा धक्का

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी आम आदमी पक्षाला (आप) मोठा झटका बसला असून आप नेते सुखबीर सिंग दलाल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. माजी आमदार आणि आपचे पाच वर्षे सदस्य असलेले सुखबीर सिंग दलाल यांनी केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा, भाजप प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा आणि इतर प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.



दिल्ली विधानसभेसाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये निवडणुका होणार आहेत आणि आप तिसऱ्यांदा सत्ता राखण्याचा प्रयत्न करत आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने ७० पैकी ६२ जागा जिंकल्या होत्या.

विधानसभा निवडणुकीसाठी आपने आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. आपच्या यादीनुसार पक्षप्रमुख अरविंद केजरीवाल नवी दिल्ली मतदारसंघातून तर मुख्यमंत्री आतिशी पुन्हा एकदा कालकाजी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

आप यादीतील इतर उमेदवारांमध्ये बुरारी येथील संजीव झा, बदली येथील अजेश यादव आणि राजिंदर नगर येथील दुर्गेश पाठक यांचा समावेश आहे. पक्षाने ओखलामधून अमानतुल्ला खान यांना उमेदवारी दिली आहे. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना जंगपुरा येथून उमेदवारी देण्यात आली आहे.

# पवारांनी घेतली संतोष देशमुख यांच्या मुलीचे शिक्षण ते कुटुंबाचे संरक्षण जबाबदारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ज्यात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. नागपुरात सुरू असलेल्या या अधिवेशनात विरोधक परभणी आणि बीडच्या घटनांवरून फडणवीस सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बीडच्या मस्साजोग येथे जाऊन दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली.



यावेळी शरद पवार यांनी देशमुख यांच्या मुलीचे संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी घेत असल्याचे जाहीर केले. तसेच देशमुख कुटुंबीयांच्या संरक्षणाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे. शरद पवार यांनी आज देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. ही घटना कशी घडली? नेमके काय घडले? याचाही त्यांनी माहिती घेतली.

यावेळी शरद पवारांनी देशमुखांच्या मुलीच्या शिक्षणाची जबाबदार घेतली. शरद पवार म्हणाले की, देशमुख यांच्या मुलीला बारामतीच्या कर्मवीर वसतिगृहात शिक्षणासाठी पाठवून द्या, तिथे ९ हजार मुली शिकत आहेत. या मुलीचा कॉलेजपर्यंच खर्च मी करतो, तुम्ही काळजी करू नका, असे शरद पवार म्हणाले. तसेच त्यांनी देशमुख कुटुंबाच्या संरक्षणाची जबाबदारीही घेतली. यावेळी खासदार निलेश लंके, बजरंग सोनावणे आणि माजी मंत्री राजेश टोपे हे देखील त्यांच्यासोबत होते.

## 'द मॅट्रिझ'चा सर्वेक्षणातून उघड

# मोदींचा करिष्माच; तर राहुल गांधी पुन्हा फेल !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सलग तिसऱ्यांदा लोकसभा निवडणुकीत विजय मिळवत सत्ता स्थापन केलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा अजिबात कमी झालेला नाही, असे निरीक्षण 'द मॅट्रिझ'च्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. तसेच महाराष्ट्र व हरियाणा या दोन राज्यांत भाजपाने मिळवलेल्या यशात देखिल मोदी यांच्या लोकप्रियतेचा मोठा वाटा होता, असेही यात नमूद करण्यात आले आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपने ४०० जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले होते. पण प्रत्यक्षात २४० जागांवरच समाधान मानावे लागले होते. यानंतर पंतप्रधान मोदी यांचा करिष्मा कमी झाल्याची टीका विरोधकांनी सुरु केली होती. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या हरियाणा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला दणदणीत यश मिळाले.





या दोन राज्यातील निवडणुकांमध्ये कोणते घटक प्रभावी ठरले, यासंदर्भात 'द मॅट्रिझ'ने तपशीलवार सर्वेक्षण केले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर २५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत महाराष्ट्रासह हरियाणात हे सर्वेक्षण करण्यात आले. यात महाराष्ट्रातील ७६,८३० तर हरियाणातील ५३,६४७ मतदारांचा कौल घेण्यात आला.

दहा वर्षांपूर्वी म्हणजेच २०१४ मध्ये देश पातळीवर भाजपाचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता आजही कमी झालेली नाही. सलग दोन लोकसभा निवडणुकीत भाजपाने स्वबळावर बहुमताचा आकडा पार केला होता. यंदा मात्र भाजपाला २४० जागाच जिंकता आल्या. असे असूनही हरियाणा व महाराष्ट्रात मोदींना मोठा जनाधार असल्याचे सर्वेक्षणातून स्पष्ट झाले. मोदींच्या लोकप्रियतेत वाढ झाली असल्याचे महाराष्ट्रातील ५५ टक्के, तर हरियाणातील ५३ टक्के मतदारांनी सर्वेक्षणात नमूद केले.



"जर २५ वर्षांपूर्वी कोणी सांगितलं असतं की, तुझ्याकडे स्मार्ट फोन असेल आणि भारतीय क्रिकेटपटू म्हणून माझ्या कारकीर्दीच्या अखेरच्या दिवशी माझा कॉल लॉग असा असेल तर हे ऐकून मला हृदयविकाराचा झटका आला असता. सचिन पाजी आणि कपिल देव पाजी तुमचे खूप खूप आभार.

— आर. अश्विन

'होय, मी खचलो आहे. ऑस्ट्रेलियासाठी खेळण्याचे माझे स्वप्न पूर्ण झाले, पण मला हवे तसे नाही खेळात असे घडते. मी कठोर परिश्रम करेन आणि पुढील संधीसाठी स्वतःला तयार करेन.

— नॅथन मॅकस्विनी



### ३८२ धावा करूनही मुंबई हरली : अय्यरचे शतक वाया

# कर्नाटकच्या पारड्यात विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत तब्बल ३८३ धावांचे लक्ष्य पुर्ण करत कर्नाटकने मुंबईला ७ विकेट्सने पराभूत केले. या स्पर्धेच्या इतिहासात कर्नाटक सर्वाधिक लक्ष्याचा पाठलाग करणारा कर्नाटक दुसरा संघ ठरला. यापूर्वी २०१२ मध्ये आंध्र प्रदेश संघाने ३८४ धावांचा यशस्वी पाठलाग करून गोवा संघाला पराभूत केले होते.

अमहदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर कर्णधार श्रेयस अय्यरने चौफेर फटकेबाजी करत ११४ धावांची शतकी खेळी केली. त्याचबरोबर इतर तीन फलंदाजांच्या अर्धशतकी खेळीसह मुंबईने कर्नाटकला विजयासाठी तब्बल ३८३ धावांचे आव्हान दिले. पण केएल श्रीजीथच्या दीडशतकी व अनिष केव्ही, प्रवीण दुबे यांच्या अर्धशकी खेळीने कर्नाटकच्या पारड्यात विजय खेचून आणला.




कर्नाटकने नाणेफेक जिंकला पण प्रथम फलंदाजीसाठी मुंबईला बोलावले. मुंबईचा पहिला विकेट अवघ्या ७ धावांवर गेला, अंगक्रिश रघुवंशी ६ धावा करून बाद झाला. पण त्यानंतरच्या फलंदाजांनी मात्र तुफान फटकेबाजी केली. युवा आयुष म्हात्रे व हार्दिक तामोरेने दुसऱ्या विकेटसाठी १४१ धावांची भागीदारी केली. ३० व्या षटकात शेवटच्या चेंडूवर आयुष म्हात्रे बाद झाला. त्याने ८२ चेंडूत ७८ धावा केल्या, त्यानंतर हार्दिक तामोरे ९४ चेंडूत ८४ धावा करून माघारी परतला.

श्रेयस अय्यरला सूर्याने २० धावांची साथ दिली, पण त्यानंतर शिवम दुबे फलंदाजीसाठी आला आणि दोघांनी मोठी भागीदारी उभारली. श्रेयस अय्यर व शिवम दुबेने १४८ धावांची नाबाद भागीदारी केली. ज्यामध्ये श्रेयस अय्यरने १० षटकार व ५ चौकारांसह ५५ चेंडूत ११४ धावांची जलद खेळी केली. तर, ५ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने शिवम दुबेने ३६ चेंडूत ६३ धावा कुटल्या.

कर्नाटकने ३८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरूवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सलामीवीर निकीन जोश २१ तर मयंक अगरवालने ४७ धावा केल्या. त्यानंतरच्या फलंदाजांनी तुफान फटकेबाजीसह मुंबईला बॅक फूटवर टाकले व आपला विजय सोपा केला. अनिष केव्ही शतकापासून १८ धावांनी वंचित राहिला. त्याने ६६ चेंडूत ८२ धावांची खेळी केली.

## इन्फोसिस, ब्रिटीश पेट्रोलियम इलेव्हन संघांनी दिवस गाजवला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टीआरपीएस मॅनेजमेंट, अतुल ट्युटोरीयल्स् आणि लायन्स् क्लब पुणे रहाटणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तर्फे पहिल्या 'टीआरपीएस कॉर्पोरेट करंडक' टी-२० क्रिकेट स्पर्धेत ब्रिटीश पेट्रोलियम इलेव्हन आणि इन्फोसिस या संघांनी अनुक्रमे एफआयएस आणि अलियान्स् बर्नस्टन संघाचा पराभव करून उद्घाटनाचा दिवस गाजवला.

हिंजेवाडी येथील फोरस्टार मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये संदीप संघई याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे इन्फोसिस संघाने अलियान्स् बर्नस्टेनः संघाचा ११३ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळताना ऋषीकेश खांडेकर (५९ धावा) आणि संदीप संघई (४९ धावा) यांच्या फलंदाजीमुळे इन्फोसिसने १८७ धावांचे आव्हान उभे केले. या लक्ष्याचा पाठलाग करताना अलियान्स् बर्नस्टेनचा डाव ७४ धावांवर गडगडला. इन्फोसिसच्या निखील रोकडे याने ३ गडी तर, संदीप संघई आणि सौरभ पवार यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला सहज विजय मिळवून दिला.





प्रेमसुख बिष्णोई याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे ब्रिटीश पेट्रोलियम इलेव्हनने एफआयएस संघाने केवळ एका धावेनी सनसनाटी विजय मिळवून शानदार सुरूवात केली. पहिल्यांदा फलंदाजी करताना ब्रिटीश पेट्रोलियम इलेव्हनने १५१ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये रतिश नायर याने ५० धावा आणि अनमित्रो जे. (५० धावा) यांनी अर्धशतकी खेळी केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना एफआयएस संघाने चांगली सुरूवात केली होती. निखील भुजबळ (४३ धावा) आणि प्रशांत पोळ (३६ धावा) यांनी धावा जमविल्यानंतर सरासरी धावगती राखण्यामध्ये मोक्याच्या क्षणी एफआयएसचे फलंदाज बाद झाले आणि संघाला एका धावेने पराभव स्विकारावा लागला.

## सोशल मीडियावर व्हायरल होतोय हा अनोखा रन आऊट



**नवी दिल्ली :** एखादा दिवस नशीब एवढं खराब असतं की त्यापुढे कोणाचंच चालत नाही. मग ते खासगी आयुष्य असो की खेळाचे मैदान, एखादं संकट असं अचानक येतच. आजचा किस्साही असाच आहे क्रिकेटच्या मैदानातला. क्रिकेट सामन्यांमध्ये आपल्याला अनेक विनोदी किस्से पाहायला मिळतात. पण हा किस्सा पाहून काहीजण हसतील, तर काहींना वाईट देखील वाटेल. काहीजण व्हिडीओमधील फलंदाजाला दोष देतील, तर काहीजण त्याच्या नशीबाला. सोशल मीडियावर एक व्हिडीओ प्रचंड व्हायरल होत आहे. ज्यामध्ये क्रिकेटच्या मैदानावरील एक अनोखा रन आऊट पाहायला मिळत आहे. फलंदाजाचे नशीब खराब होतेच पण थोडा त्याचा अतीशाहाणपणा नडला आणि तो बाद होऊन हसत हसत तंबूत परतला. व्हिडीओतील कमेंटमध्ये प्रत्येकाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. पण हा व्हिडीओ पाहा आणि ठरवा कोणाची चूक आहे. झालं असं की, फलंदाजाने शॉर्टच्या देशेने चेंडूला दिशा दिली.

## १५ चेंडूत ८० धावा ! श्रेयस अय्यरचे वादळी शतक



**नवी दिल्ली :** सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकणारा मुंबईचा कर्णधार श्रेयस अय्यरने दमदार शतक झळकावले. विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेला आजपासून सुरूवात झाली आणि कर्नाटक संघाविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात मुंबईने मोठी धावसंख्या उभी केली. आयुष म्हात्रे, हार्दिक तामोरे यांच्या फटकेबाजीनंतर श्रेयस व शिवम दुबे यांनी आतषबाजी केली. प्रथम फलंदाजीला आलेल्या मुंबईला चौथ्या षटकात विद्याधर पाटीलने धक्का दिला. सलामीवीर अंगकृष रघुवंशी ( ६) याला त्याने कॉट अँड बोल्ड केले. पण, त्यानंतर आयुष व हार्दिक ही जोडी चांगलीच जमली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी १४१ धावांची भागीदारी करताना मुंबईचा पाया मजबूत केला. ३०व्या षटकात प्रविण दुबेने ही जोडी तोडली. आयुष ८२ चेंडूंत ६ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ७८ धावांवर माघारी परतला. हार्दिक व कर्णधार अय्यर यांना ३० धावाच जोडता आल्या. श्रेयस गोपाळने मुंबईला धक्का देताना हार्दिकला बाद केले.

## झिंदाने स्वीलर्स, हिलयॉस ईगल्स संघ विजयी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुना क्लब फुटबॉल लीग स्पर्धेत साखळी फेरीत झिंदाने स्वीलर्स, हिलयॉस ईगल्स , जेट्स, एएसआर स्ट्रायकर्स, परमार ऑल स्टार्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पुना क्लब फुटबॉल मैदान येथे सुरू असलेल्या मुंबई फाल्कन्स अँड टेरीरोचे मालक अमित गढोक यांचे प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत चुरशीच्या लढतीत जिओ लिजेंड्स संघाने एएसआर स्ट्रायकर्स संघाला २-२ असे बरोबरीत रोखले. जिओ लिजेंड्स संघाकडून योहान अंकलेसारिया(२ मि.), ओंकार कुलकर्णी(२० मि.) यांनी गोल केले, तर एएसआर स्ट्रायकर्सकडून कबीर सरीन(४, २६ मि.)याने दोन गोल केले. दुसऱ्या सामन्यात अरन थवानी(५ मि) याने नोंदवलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर हिलयॉस ईगल्स संघाने आमदु कलेक्टिव्ह संघाचा १-० असा सनसनाटी पराभव केला. अन्य लढतीत झिंदाने स्वीलर्स संघाने हॉटफुट संघावर २-० असा विजय मिळवला. विजयी संघाकडून विधुर मेहमी(६ मि.), राहुल हरपलानी(२६ मि.) यांनी प्रत्येकी एक गोल केला.

## मॅकस्वीनीला डच्चू, कोन्सटासला संधी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मेलबर्न :** प्रतिष्ठेच्या बॉर्डर-गावस्कर करंडकासाठीच्या कसोटी क्रिकेट मालिकेतील अखेरच्या दोन सामन्यांसाठी ऑस्ट्रेलियाच्या संघात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून सलामीवीराच्या स्थानासाठी नेथन मॅकस्वीनीच्या जागी १९ वर्षीय सॅम कोन्सटासची निवड करण्यात आली आहे.

भारताविरुद्धच्या या मालिकेतच आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळालेल्या मॅकस्वीनीला ऑस्ट्रेलियाच्या संघातून वगळण्यात आले आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये मधल्या फळीत खेळणाऱ्या मॅकस्वीनीला सलामीला पाठविण्यात आले. मात्र, विशेषत: जसप्रीत बुमराच्या भेदकतेसमोर तो पूर्णपणे निष्प्रभ ठरला. त्याला तीन कसोटी सामन्यांच्या सहा डावांत केवळ ७२ धावा करता आल्या. त्याने अनुक्रमे १०, ०, ३९, नाबाद १०, ९ आणि ४ धावा अशी कामगिरी केली.

## डायनामाईट्स एफसी, इन्फंट्स एफसी संघांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुरू श्री तेगबहादुर यांच्या हौतात्म्याला ३४९ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून लायन रानी अहलूवालीया व गुरू तेगबहादुर फाऊंडेशनचे अध्यक्ष एस. एस. अहलुवालिया, गुरू तेगबहादुर फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित २३व्या गुरू तेगबहादुर गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेत ज्युनियर गटात डायनामाईट्स एफसी, इन्फंट्स एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.



रेंजहिल्स स्पोर्ट्स मैदान, खडकी येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ज्युनियर गटात डायनामाईट्स एफसी संघाने लौकिक एफए संघाचा टायब्रेकरमध्ये ५-२ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. निर्धारित वेळेत डायनामाईट्स एफसीकडून अनिकेत भरसाकले ४५ मि.)याने तर, लौकिक एफएकडून हरीश तुमराम १८ मि.) याने गोल केले व त्यामुळे सामना १-१ बरोबरीत सुटला.

सामना बरोबरीत सुटल्यामुळे टायब्रेकर पद्धतीचा अवलंब करण्यात आला. टायब्रेकरमध्ये विजयी संघाकडून सूरज लाड, अनिकेत भरसाकळे, अथर्व जाधव, सार्थक तावरे यांनी गोल केले. तर, पराभूत संघाकडून पवन दौलताबाद, चेतन सिंग यांनी चेंडू बाहेर मारले

. दुसऱ्या लढतीत इन्फंट्स एफसी संघाने सनी डेज एफसी संघाचा २-० असा पराभव करून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. इन्फंट्स एफसीकडून स्टीव्हन कोटे(३९मि.), सोहेल शेख(४५मि.) यांनी प्रत्येकी एक गोल करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## झिम्बाब्वेचा निम्मा संघ ३३ धावांत तंबूत पाठवला

**नवी दिल्ली :** अफगाणिस्थानचा युवा गोलंदाज अल्लाह गझनफरला आयपीएल २०२५ लिलावात मुंबई इंडियन्सने संघात सामील केले.



वेगवान गोलंदाजांचा भरणा असलेल्या मुंबईने या युवा फिरकीपटूला ४ कोटी ८० लाख रूपयांत करारबद्ध केले. सध्या सुरू असलेल्या अफगाणिस्तान विरूद्ध झिम्बाब्वे मालिकेत त्याने संघातील स्वत:चे स्थान उल्लेखनीय कामगिरीसह सिद्ध केले आहे. अल्लाह गझनफरने तीन सामन्यांच्या मालितकेत एकूण ९ विकेट्स घेतले. ज्यामध्ये त्याने ३३ धावांत फायफर (५ विकेट्स) पुर्ण केला व झिम्बाब्वेचा डाव अवघ्या १२७ धावांवर गुंडाळला. सलामीवीर जॉयलॉर्ड गुम्बीला (३) बाद करून १९ धावांवर त्याने झिम्बाब्वेला पहिला धक्का दिला. दुसरा सलामीवर बेन करनलाही त्याने १२ धावांवर माघारी पाठवले. सामन्यात झिम्बाब्वेच्या अवघ्या ४ खेळाडूंनी दुहेरी धावसंख्या केली. ज्यामध्ये सीन विल्यम्सने ६ षटकार व ३ चौकारांच्या मदतीने ६० धावांची अर्धशतकी खेळी केली. त्याच्याव्यतिरिक्त कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. गझनफरने दोन फलंदाज मागोमाग शून्यावर बाद केले.

## खो-खो चा देशव्यापी शालेय सहभागाला गती; मोहिम पुणे, जयपूर, अहमदाबाद, दिल्लीमध्ये दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विश्वचषक खो-खो स्पर्धेच्या निमित्ताने विविध शाळांना जोडून घेण्याच्या उपक्रमाला सर्वांसाठी खेळ (एसएफए) या संघटनेच्या मार्फत गती मिळाली असून, भारतीय खो-खो महासंघाचा हा देशव्यापी कार्यक्रम आता देशातील अनेक प्रमुख शहरांत पोहचू लागला आहे.

सुरुवातीच्या मर्यादित यशानंतर आता या उपक्रमाने विस्तारीत रुप घेतले आहे. चार प्रमुख शहरांमधील मुख्य शिक्षण संस्था या उपक्रमात सहरभागी झाल्या आहेत. जयपूर मुक्कामी टागोर पब्लिक स्कूल, सेंट झेवियर स्कूल, किडस



क्लब सिनियर सेकंडरी स्कूल, एसआरएन आंतरराष्ट्रीय स्कूल यांनी सहभाग घेतला. अहमदाबाद शहरात वेद इंटरनॅशनल, केनॅली ली स्कूल, एईएस एजी प्राथमिक स्कूल यांनी सहभाग घेतला. पुण्यातून सिटी प्राईड स्कूल या वाढत्या चळवळीचा भाग बनली. या खेरीज दिल्ली एनसीआर आणि जवळच्या परिसरातील शाळांनीही हा उपक्रम उत्साहाने स्विकारला आहे. आपोलो कॉन्व्हेंट स्कूल, होलंबी कलान, क्रिसेंटस पब्लक स्कूल पीतमपुरा, डीएलएफ पब्लिक स्कूल गाझियाबाद, डून भारती पब्लिक स्कूल फरिदाबाद, जीआर इंटरनॅशलन स्कूल पूथखुर्द, ग्यानंदा स्कूल गुरुग्राम, इंदिरापुरम पब्लिक स्कूल, क्रॉसिंग रिपब्लिक, केसी इंटरनॅशनल स्कूल जलालापूर, नॉएडा एक्स्टेंन्स,एमडीएप इंटरनॅशनल स्कूल सेक्टर ६, द्वारका प्रुडेन्स स्कूल द्वारका, सफायर इंटरनॅसन स्कूल नॉएडा, सेंट मेरीज स्कूल ग्रेटन नॉएडा पश्चिम, सेंट फ्रोएबल सिनियर सेकंडरी स्कूल पश्चिम विहार इतक्या शाळांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला आहे.

## एन. बी.करंडक २०२४ क्रिकेट स्पर्धेत पूना क्लब संघाचा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नीलेश भिंताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एन.बी. करंडक २०२४(१७ वर्षाखालील) क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत पूना क्लब संघाने दुसरा विजय मिळवला.

सनी स्पोर्ट्स, हांडेवाडी व ब्रिलियंट क्रिकेट क्रीडांगणा येवलेवाडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत अर्जुन देशमुख(२-९) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर पूना क्लब संघाने कोद्रे फार्म संघाचा ९ गडी राखून पराभव केला.





दुसऱ्या सामन्यात उमेश चव्हाण(४-२३) याने केलेल्या शिस्तबध्द गोलंदाजीच्या जोरावर स्पेशलाईज क्रिकेट क्लब संघाने कोद्रे फार्म संघाचा ६ गडी राखून पराभव केला.

## रे मिस्टेरिओ सिनियर यांचे वयाच्या ६६ व्या वर्षी निधन

**नवी दिल्ली :** मेक्सिकोचे दिग्गज व्यावसायिक कुस्तीपटू आणि प्रशिक्षक रे मिस्टेरिओ सिनियर यांचे वयाच्या ६६व्या वर्षी निधन झाले. ते डब्लूडब्लूई हॉल ऑफ फेम रे मिस्टेरिओ व सुपरस्टार डॉमिनिक मिस्टेरिओचे काका होते. मिस्टेरियो यांचा मुलगा मिग्युएल आरोन लोपेझ हर्नांडेझ याने त्याच्या फेसबूक पोस्टवरून ही बातमी दिली. मिस्टेरिओ १९७६ मध्ये व्यावसायिक कुस्तीपटू झाले आणि २००९ पर्यंत ते सक्रिय राहिले. त्यांनी त्यानंतर काही काळ पुनरागमन केले होते, परंतु २०२३ मध्ये ते शेवटची फाईट खेळले. मिस्टेरिओने जागतिक कुस्ती संघटनेसह अनेक मेक्सिकन जाहिरातींमध्ये काम केले. त्यांनी एकदाच WWA वर्ल्ड ज्युनियर लाइट हेव्हीवेट चॅम्पियनशिप जिंकली आणि रे मिस्टेरिओ ज्युनियरसह WWA टॅग टीम चॅम्पियनशिप देखील जिंकली होती. १९९० मधील वर्ल्ड चॅम्पियनशिप रेसलिंगच्या स्टारकेड सारख्या इव्हेंटसह त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा दाखवली. त्यांची हवेत गिरक्या घेऊन प्रतिस्पर्धींना चितपट करण्याची शैली, आजही सर्वांच्या चांगल्याच आठवणीत असेल.

## बांगलादेशने ८० धावांनी जिंकला तिसरा टी-२० सामना; इंडिजविरुद्ध क्लीन स्वीप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशने तिसऱ्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजचा ८० धावांनी पराभव केला आहे. अशाप्रकारे बांगलादेशने ३ सामन्यांची मालिका ३-० ने जिंकली आणि टी-२० फॉरमॅटमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध प्रथमच क्लीन स्वीप केला. किंग्स्टन येथे शुक्रवारी झालेल्या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार लिटन दासने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ७ बाद १८९ धावा केल्या. प्रत्युत्तरात कॅरेबियन संघ १६.४ षटकांत १०९ धावांवर ऑलआउट झाला. झाकेर अलीने नाबाद ७२ धावा केल्या. त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.



बांगलादेशकडून झाकेर अलीने नाबाद ७२ धावा केल्या बांगलादेशकडून झाकेर अलीने ४१ चेंडूत नाबाद ७२ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ३ चौकार आणि ६ षटकार मारले. परवेझ हुसेन इमॉनने २१ चेंडूत ३९ धावा केल्या. तर मेहंदी हसन मिराजने २३ चेंडूत २९ धावांचे योगदान दिले. वेस्ट इंडिजकडून रोमॅरियो शेफर्डने सर्वाधिक २ बळी घेतले. याशिवाय अल्झारी जोसेफ, रोस्टन चेस आणि गुडाकेश मोटे यांनी १-१ गडी बाद केला.

रिशाद हाऊसेनने ३ बळी घेतले १८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची सुरुवात खूपच खराब झाली. संघाच्या विकेट्स सातत्याने पडत होत्या. सलामीवीर ब्रँडन किंग शून्यावर बाद झाला. तर जॉन्सन चार्ल्सने १८ चेंडूत २३ धावांचे योगदान दिले. वेस्ट इंडिजसाठी रोमारिया शेफर्डने २७ चेंडूत सर्वाधिक ३३ धावा केल्या. या खेळीत त्याने १ चौकार आणि ३ षटकार मारले.

### शाहिन आफ्रिदी-नसीम शाह यांची शानदार गोलंदाजी; कामरान गुलाम सामनावीर

# पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेचा केला पराभव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ३ सामन्यांच्या वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेचा ८१ धावांनी पराभव केला. पाकिस्तानने तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेत मालिकेवरही कब्जा केला आहे. कामरान गुलामला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. या सामन्यात पाकिस्तानने प्रथम खेळताना ४९.५ षटकांत ३२९ धावा केल्या, पण प्रत्युत्तरात यजमान दक्षिण आफ्रिकेला ४३.१ षटकांत केवळ २४८ धावा करता आल्या.



शाहिन आफ्रिदी आणि नसीम शाह यांची शानदार गोलंदाजी शाहिन आफ्रिदी आणि नसीम शाह यांनी शानदार गोलंदाजी केली. आफ्रिदीने ८ षटकात ४७ धावा देत ४ बळी घेतले. तर नसीम शाहने ८.१ षटकात ३७ धावा देत ३ बळी घेतले. अबरार अहमदला २ तर सलमान आघाला एक यश मिळाले.

क्लासेन आणि डेव्हिड मिलर यांच्यात ७२ धावांची भागीदारी ३२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात चांगली झाली नाही. त्याची पहिली विकेट केवळ ३४ धावांवर पडली. कर्णधार टेंबा बावुमा १२ धावा करून बाद झाला. टोनी डीजॉर्जने ३४ धावा केल्या. तर एडन मार्कराम २१ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. आफ्रिकेने ११३ धावांत ४ विकेट गमावल्या होत्या. यानंतर डेव्हिड मिलर आणि हेनरिक क्लासेन यांनी दक्षिण आफ्रिकेचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. दोघांमध्ये पाचव्या विकेटसाठी ७२ चेंडूत ७२ धावांची भागीदारी झाली. क्लासेनने ७४ चेंडूत ९७ धावा केल्या, पण संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. कामरान, बाबर आणि रिझवान यांनी अर्धशतके केली या सामन्यात आधी पाकिस्तानने प्रथम फलंदाजी केली आणि कामरान गुलामने अतिशय वेगवान खेळी केली. त्याने प्रथम आपले अर्धशतक २५ चेंडूत पूर्ण केले आणि नंतर ३२ चेंडूत ५ षटकार आणि ४ चौकार मारले.

SUNDAY EDGE

पंढरी संचार pandharisanchar.com 22•DEC•2024



# झंझावती २०२४

**या वर्षाची सुरुवातच अयोध्येतील राम मंदिराचे लोकार्पण होण्याने झाली. तब्बल पाच शतकांचा रक्तरंजित कलंक २२ जानेवारी, २०२४ या दिवशी पुसला गेला. तसेच भारताच्या दृष्टीने वार्षिक घटनांचा आढावा घेतल्यास आठव्या लोकसभेसाठी झालेली निवडणूक ही सर्वात महत्त्वाची घटना ठरते. तसे बघितल्यास सरते वर्ष हे भारताच्याच नव्हे तर, भारतीय उपखंडाच्या आणि जिथे जिथे भारतीय समाज पोहोचला आहे, त्या सर्वच ठिकाणी प्रभाव टाकणारे ठरले. वर्षाची सुरूवातच राममंदीर सारख्या ऐतिहासिक क्षणांनी झाली आणि एकाच व्यक्तीला लागोपाठ तीन वेळा पंतप्रधान करण्याचा बहुमान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने घडवला ....**



## मागोवा

प्रितीश पंडित
पंढरी संचार



या सहस्त्रकातील पहिल्या शतकाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना, आपण फक्त गेल्या वर्षभरातील घडामोडींचा मागोवा घेतल्यास, त्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते. सरते वर्ष हे भारताच्याच नव्हे तर, तसे बघितल्यास भारतीय उपखंडाच्या आणि जिथे जिथे भारतीय समाज पोहोचला आहे, त्या सर्वच ठिकाणी प्रभाव टाकणारे ठरले, यात काडी मात्र शंका नाही.

या वर्षाची सुरुवातच अयोध्येतील राम मंदिराचे लोकार्पण होण्याने झाली. तब्बल पाच शतकांचा रक्तरंजित कलंक २२जानेवारी, २०२४ या दिवशी पुसल्या गेला. यासाठी कित्येक वर्ष, कित्येक संघटना, लाखो- करोडो लोक झगडत होते. १५व्या शतकात मुघल शासक बाबर याने रामजन्मभूमीच्या जागेवर बांधलेली मस्जिद'बाबरी मस्जिद'म्हणून ओळखली जायची. त्याचे पुनरुत्थान करून तेथे परत मंदिर बांधण्यासाठी १८५० पासूनच हिंसक आंदोलन सुरू झाले. कालांतराने बऱ्याच काळानंतर विश्‍व हिंदू परिषदेने, नऊ नोव्हेंबर,१९८९ रोजी खूप गाजावाजा करून तेथे राम जन्मभूमीसाठी शिलान्यास केला. नंतर सहा डिसेंबर, १९९२ रोजी बाबरी मस्जिद जमीन दोस्त झाली आणि एक प्रदीर्घ न्यायालयीन लढा आरंभ झाला. यथावकाश २०२९ मध्ये सुप्रीम कोर्टाच्या अंतिम निकालानंतर ५ऑगस्ट, २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राम जन्मभूमीच्या जागेवर अति भव्य मंदिराचे भूमिपूजन केले.

याच वर्षी नागरशैलीतील भव्य राममंदिराचा लोकार्पण सोहळा २२ जानेवारी रोजी पार पडला. या भव्य मंदिराची रचना वास्तुविशारद चंद्रकांत सोमपुरा यांनी केलीय. या भव्यदिव्य सोहळ्यासाठी देशभरातून रथी-महारथींनी उपस्थिती लावली, यातच त्याची भव्यता अधोरेखित होते.

भारताच्या दृष्टीने वार्षिक घटनांचा आढावा घेतल्यास आठव्या लोकसभेसाठी झालेली निवडणूक ही सर्वात महत्त्वाची घटना ठरते. मुळातच देशाच्या नव्हे तर जगाच्या ही दृष्टीने ही सर्वात मोठी निवडणूक ठरली मुख्य निवडणूक आयुक्त यांनी १६ मार्च,२०२४ रोजी पत्रकार परिषदेत घोषणा केल्यानुसार सात टप्प्यांमध्ये ही निवडणूक झाली. त्याचा पहिला टप्पा १९ एप्रिलला संपला, तर सातवा टप्पा एक जून रोजी संपून, चार जूनला मतगणना पार पडली.

या निवडणुकीने भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात पंडित नेहरू नंतर, पहिल्यांदा एकाच व्यक्तीला लागोपाठ तीन वेळा पंतप्रधान करण्याचा बहुमान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने घडवला. भारतासारख्या खंडप्राय देशात जेथे निरनिराळे राजकीय पक्ष आहेत, वेगवेगळे मतप्रवाह आहेत, तेथे ही बाब अतिशय महत्त्वपूर्ण ठरते. या निवडणुकीच्या आकडेवारीकडे लक्ष दिल्यास त्याची भव्यता लक्षात येते तब्बल ९६कोटी ८८ लाखांच्यावर मतदार नोंदणीकृत होते. त्यातील साधारण ६६ टक्के म्हणजेच, ६४ कोटीच्या वर मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तरीही मतदानाची ही टक्केवारी मागील सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा थोडी कमी होती.

यामध्ये देशातील दोन मुख्य पक्षांच्या मतदानाचा तौलनिक अभ्यास करताना लक्षात येते की भारतीय जनता पक्षाला ३६.५६% मते मिळाली जी मागील निवडणुकीपेक्षा साधारणपणे एक टक्का कमी झालीत. या उलट भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला २१.५९% मते मिळाली ,ती त्यांना मिळालेल्या मागील निवडणुकीपेक्षा दोन टक्के एवढी जास्त आहेत. तंतोतंत आकडेवारी लक्षात घेतल्यास भाजपला २३ कोटी ५९लाख अधिक आणि काँग्रेसला १३ कोटी ६७ लाख अधिक मते मिळाली. दोघांच्याही आकडेवारीचा विचार करताना भाजप प्रणित एनडीएला ४२.५० टक्के मते मिळाली आणि २९३ जागा मिळून पूर्ण बहुमत मिळाले, तर काँग्रेस प्रणित 'इंडिया'आघाडीला (Indian National Developmental Inclusive Alliance) ४०.६०% मते मिळून २३४ जागा मिळाल्यात. त्यामध्ये काँग्रेसच्या एकट्याच्या ९९ जागा आहेत तर, भाजपच्या जागा २४० एवढ्या आहेत. या निवडणुकीने भारतात द्विपक्षीय लोकशाही रुजवण्याकडे वाटचाल वेगाने सुरू केली,असे म्हणण्यास वाव आहे. भारतात परत एकदा मोदी सरकार आल्याने स्थिरता आणि पारदर्शक राज्यकारभार याला जनतेने कौल दिला, असे म्हणायला जागा आहे. देशाची आर्थिक प्रगती निश्‍चितच अधिक वेगाने होऊ शकेल. जगाच्या ही दृष्टीने मोदी सरकार भारतात तिसऱ्यांदा सत्तेत आल्याने खूप फरक पडतो. या निवडणुकीने चंद्राबाबू नायडू यांना आंध्र प्रदेशमध्ये परत महत्त्वाचे स्थान मिळवून देऊन मुख्यमंत्रीपदाची खुर्ची दिली. त्याचबरोबर या निवडणुकीने चंद्रशेखर राव, नवीन पटनायक, जगनमोहन रेड्डी, सुखबीर बादल अशा क्षेत्रिय परंतु महत्त्वाच्या नेत्यांना राजकीय क्षितिजावरून दूर ढकलले.



लोकसभा निवडणुकीनंतर देशात झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये हरियाणा , जम्मू काश्मीर आणि महाराष्ट्र ही राज्ये प्रमुख आहेत. त्यात जम्मू आणि काश्मीरमध्ये केंद्रशासित प्रदेश जाहीर झाल्यानंतर प्रथमतः निवडणूक पार पडली आणि ती अतिशय यशस्वीपणे झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला मुख्यमंत्रीपदी आलेत. भारतीय जनता पक्ष दोन नंबरचा राजकीय पक्ष येथे ठरला.




हरियाणा आणि महाराष्ट्रात मात्र परत एकदा मतदारांनी भारतीय जनता पक्षाला जनादेश दिला. त्यात महाराष्ट्राच्या निवडणुकीने तर एक प्रकारे ऐतिहासिक असाच निकाल दिला २८८ संख्यांबळ असणाऱ्या विधानसभेत तब्बल २३७ जागा भाजप आणि मित्र पक्षांच्या पारड्यात टाकल्यात. एक प्रकारे दोन्ही राज्यांमध्ये द्विपक्षीय लोकशाही कडे जनतेचा कौल दिसून आला.

२०२४ या वर्षाचा मागोवा घेताना मावळते सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. मागील आठ नोव्हेंबरला त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला पण त्यापूर्वी ते दीर्घकाळ देशाचे सरन्यायाधीश होते. त्यांचे वडील यशवंतराव चंद्रचूड हे सुद्धा भारताच्या सरन्यायाधीश पदी राहिलेले आहेत. आता संजीव खन्ना यांनी सरन्यायाधीश पदाची सूत्रे हाती घेतली आहेत याचबरोबर रिझर्व बँक ऑफ इंडियाला संजय मल्होत्रा यांच्या रूपाने नवीन गव्हर्नर मिळाले. मावळते गव्हर्नर शशिकांत दास हे प्रदीर्घकाळ रिझर्व बँकेचे गव्हर्नर होते. मुख्य म्हणजे नोटाबंदी आणि जीएसटी सारखे विषय त्यांच्या कार्यकाळातच राबवले गेलेत. सरत्या वर्षातील नोंद घेण्यासारख्या आणखीन दोन घडामोडी म्हणजे यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना मिळाला. त्याचप्रमाणे अंदमान निकोबार द्वीप समूहाच्या राजधानी पोर्ट ब्लेअर चे नाव बदलून श्रीविजयपूर हे नवीन नाव त्याला दिले गेले, अशा प्रकारे २०२४ हे वर्ष सर्वार्थाने एक अतिशय महत्त्वाचे वर्ष ठरले.


# राखेतून पुन्हा उभा राहिलेला आगळा वेगळा स्थापत्य फिनिक्स

**शतकानुशतके भव्यपणे उभ्या असणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंना जतन करणे आणि त्यांचे संवर्धन करणे हे पाश्चिमात्य देशांचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे असे ठामपणे म्हणून शकतो कारण सगळ्याच पाश्चिमात्य देशात त्यांच्या सगळ्या शतकानुशतके जुन्या ऐतिहासिक वास्तू नव्हेत तर अगदी त्या त्या काळातील स्वयंपाकघरे, पेहराव, शेतीची औजारे, भांडी-कुंडी देखील जतन केलेली आढळून येतात. मध्ययुगीन नॉत्र दाम कॅथिड्रलच्या जीर्णोद्धाराच्या उद्घाटनाचा सुंदर सोहळा फ्रान्स हा विकसित, आधुनिक आणि अत्यंत कलात्मक पश्चिमी देश देखील याला अजिबात अपवाद नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. याचं कारणही तसेच आहे.**









## वारसा

गायत्री चंदावरकर
लेखिका संस्कृतीच्या अभ्यासक आहेत
पंढरी संचार



8 डिसेंबरला अमेरिकेचे नवोदित भावी अध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष ईमॅनुएल मॅक्रो यांच्याबरोबर अमेरिकेच्या सध्याच्या फर्स्ट लेडी जिल बायडेन, ब्रिटनचे युवराज विल्यम, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झिलिन्स्की, अमेरिकेन उद्योगपती इलॉन मस्क, अनेक कलाकार तसेच असंख्य आस्तिक - नास्तिक फ्रेंच नागरिक आणि फ्रान्समध्ये आलेले जगभरातील प्रवासी यांनी मध्ययुगीन नॉत्र दाम कॅथिड्रलच्या जीर्णोद्धाराच्या उद्घाटनाचा सुंदर सोहळा पाहिला. मध्ययुगीन नॉत्र दाम कॅथिड्रलच्या जीर्णोद्धाराचे फ्रान्सच्या दृष्टीने राजकीय तसेच जागतिक महत्त्व ८६१ वर्षांच्या नॉत्र दाम या कथिड्रलच्या भव्य दर्शनी भागात"धन्यवाद" हे शब्द अनेक भाषांत दाखवले गेले, तेव्हा फ्रेंच राष्ट्राध्यक्ष म्हणाले"ज्या सगळ्यांनी या ऐतिहासिक वास्तूच्या अनेक भागांना वाचण्याचे तसेच आगीमुळे क्षती पोचलेला मनोरा इत्यादींच्या जीर्णोद्धाराच्या कामात योगदान दिले त्यांच्यामुळेच ही जगप्रसिद्ध कथिड्रलची वास्तू पुन्हा त्याच सुंदर रूपात आपल्या देशात, जगात परत दिमाखाने उभी राहिली आहे".

ते असेही म्हणाले की जीर्णोद्धारापेक्षा या कथिड्रलला नवजीवन मिळाले असे म्हणणे योग्य ठरेल. हा आधुनिक जीर्णोद्धार, ऐतिहासिक वास्तूचे पुनरुज्जीवन हा तर फ्रान्स या देशाला मिळालेला आशा-आकांक्षेचा मिळालेला मोठठा डोज आहे, असे म्हणत त्यांनी प्रत्येक फ्रेंच नागरिकांच्या भावना जगापुढे अधोरेखित केल्या. हे कथिड्रल फ्रान्समधील प्रसिद्ध वास्तू आहे अगदी आयफेल टॉवर सारखी जगप्रसिद्ध नसली तरीही. ज्या प्रकारे यातील अनेक भाग ज्या प्रकार आगीच्या भक्षस्थानी पडले ते सगळ्या जगाने पाहिले. सिगरेटमुळे किंवा शॉर्ट सर्किट मुळे आगा लागली असं म्हटलं जातं. मात्र इतकी हानी होण्याचे कारण देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनी फायर अलार्म वाजल्यावर पटकन अग्निशामन दलाची तातडीची मदत न घेता अक्षम्य दिरंगाई केली हे आहे. त्यामुळे, फ्रेंच सरकारवर बरीच नामुष्की ओढवली. टीकेला सामोरं जावं लागलं. त्यानंतर कोविडची महासाथ आली त्यामुळे जीर्णोद्धाराचे काम जरा संथपणे सुरु झाले. कोविड संपत नाही तर देशात राजकीय अस्थैर्य निर्माण झालं आणि बरीच अशांतता होती. त्यानंतर मात्र सरकारने जीर्णोद्धाराचे काम जोरात सुरु केले आणि २०२४च्या ऑलिंपिक्सची तयारी देखील धडाक्यात केली.

ऑलिंपिक्सचा अख्ख्या फ्रान्स शहराला, सेन नदीला सामावून घेणारा आणि आधुनिकतेच्या सगळ्या मूल्यांचा जागर करणारा नेत्रदीपक सोहळ्याने फ्रान्सच्या सरकारला नवसंजीवनी दिली. तशीच संजीवनी पुन्हा एकदा मिळाल्याने फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष आणि नागरिक या दोघांचाही आत्मविश्वास वाढवणारी, आश्‍वस्त करणारी घटना ठरली, हे नक्की. म्हणूनच फ्रान्स सरकारने नॉत्र दाम कथिड्रलच्या उदघाट्न सोहळ्याची झांझ जरा जास्तच जोरात वाजवली असली तरी ऐतिहासिक वास्तूचे पुनर्निर्माण किंवा पुनरुज्जीवन कसे करावे याचे उत्तम उदाहरण जगापुढे ठेवले आहे यात शंका नाही.

१५ एप्रिल २०१९ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आगीच्या भक्षस्थानी पडलेल्या मनोऱ्याची, त्याच्या ओक लाकडांच्या कलात्मक छताची आणि आजूबाजूच्या भागाच्या जीर्णोद्धाराची सुरुवात लगेचच सुरु झाली. त्यासाठी राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान आणि फ्रेंच प्रशासनाने तज्ज्ञांचा आणि कामगारांचा खूप मोठा ताफाच या साठी दिला. गेली पाच वर्षे म्हणजेच जवळजवळ २००० दिवस अतिशय काटेकोरपणे काम करत या टीमने पुन्हा तो दिमाखदार मनोरा (spire), त्यातील ओक लाकडांच्या कमानी आणि आजूबाजूचा भाग मध्ययुगात बांधला गेला होता तसाच हुबेहूब उभा केला.

नॉत्र दाम कॅथिड्रलची रचना आणि बांधणी

बिशप मॉरिस यांच्या देखरेखीखाली जीझस ख्राईस्ट यांच्या आईचे कुमारी मारिया किंवा मेरीना समर्पित केलेले हे कथिड्रलच्या बांधकामास मध्ययुगात ११६३ साली सुरुवात झाली. शंभर वर्षात ते जवळजवळ पूर्णपणे बांधले गेले. नववा राजा सेंट लुई याच्या काळात हे कथिड्रल पूर्ण झाले. ज्यां द शेल हे त्याचे स्थापत्य विशारद होते तर नंतर पिअर द मॉंत्रुई यांनी स्थापत्य विशारद म्हणून काम पाहिले.

फ्रेंच गॉथिक गॉथिक आणि रोमन स्थापत्य शैलींचा मिलाफ असलेली ही वास्तू आहे. अप्रतिम नमुना मानल्या जाणाऱ्या या कथिड्रलमध्ये अतिशय सुंदर शिल्पकाम केलेल्या असंख्य मूर्ती आहेत. तसेच चर्चचे छत, मनोरे ओक लाकडाच्या गोलाकार कमानींनी बनले आहे.

नॉत्र दाम कथिड्रलच्या स्टेन ग्लासच्या अत्यंत सुंदर खिडक्या आहेत त्यांना रोझ विन्डोज असं म्हटलं जातं. दक्षिणेकडील भागात १३ मीटर व्यासाची रोझ खिडकी आहे. ८४ पॅनेल्स नी ही प्रचंड मोठी खिडकी बनली असून त्यावर देवदूत, अनेक संत तसेच प्रेषित, बिशप्स यांच्याबरोबर राण्या-राजे आणि हुतात्म्यांच्या प्रतिमा आहेत.

उत्तर, पश्चिम भागातील रोझ खिडक्या तेराव्या शतकातील काचेच्या आहेत आणि विशेष म्हणजे अजूनही तशाच जतन केल्या आहेत. उत्तरेकडील खिडकीवर मेरी, बालक येशू तसेच जुन्या करारात उल्लेख केलेले प्रेषित आणि राजांच्या प्रतिमा आहेत. तर पश्चिमेकडील खिडकीवर २४ किरणांवर मॅडोना , शिशु येशू तसेच इझ्राएल मधील प्राचीन १२ टोळ्या आणि १२ राशींच्या प्रतिमा आहेत.

नॉत्र दाम कॅथिड्रलचा गौरवशाली तसेच दुर्भाग्यपूर्ण इतिहास

२०१९ साली हे कथिड्रल आगीच्या भक्षस्थानी पडले असले तरी अनेक शतकांच्या त्याच्या इतिहासात या कथिड्रल वर हल्ले आणि त्यातील सुंदर कलात्मक वस्तू, कोरीव कलाकुसर तसेच मूर्ती चोरल्या गेल्या आहेत. असे असले तरी अजूनही कथिड्रल मध्ये अजूनही गॉथिक, बरोक शैलीतील मूर्ती त्याचबरोबर सतराव्या आणि अठराव्या शतकातील अवशेष आहेत. त्या अवशेषात वधस्तंभावरील येशूल घालण्यात आलेला काटेरी मुकुटाचे अवशेष तसेच त्या क्रुसातील खिळा आणि धातूची पट्टी आहे.

१७९० पासून सुरु झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीत कथिड्रलच्या वास्तूचे अपरिमित नुकसान झाले. तेव्हा या वास्तूतील धार्मिक मूर्ती आणि सुंदर कलाकुसर असणारी पॅनेल्स इत्यादींची हानी करण्यात आली. राज्यक्रांतीच्या वेळी तेथील धार्मिक मूर्तींना राजांच्या मूर्ती आहेत असे समजून संतापलेल्या जनतेने त्या मूर्ती फोडल्या.

एकोणिसाव्या शतकात मात्र पुन्हा एकदा डागडुगी, दुरुस्त्या करण्यात आल्या कारण नेपोलियन बोनापार्ट यांचा राज्यारोहण समारंभ या वास्तूत पार पडला. त्याचवेळी काही राष्ट्राध्यक्षांचे दफनविधीही करण्यात आले.

१८३१ साली जगप्रसिद्ध फ्रेंच लेख व्हिक्टर ह्युगो यांची पॅरिसचे नॉत्र दाम कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीचं इंग्रजी नाव The Hunchback of Notre-Dame असे आहे. या कादंबरीमुळे पुन्हा एकदा त्यावेळचे फ्रेंच सरकार आणि जनता यांना १८४४ ते १८६४ या काळात कथिड्रलचा जोर्णोद्धार करण्याची सुबुद्धी झाली. मग पुन्हा एकदा कॅथिड्रलचा गौरवशाली काळ सुरु झाला. २६ ऑगस्ट २०४४ साली दुसऱ्या महायुद्धात पॅरिसची जर्मनांपासून मुक्तता झाल्याचा आनंद याच वास्तूत मेरीवरील magnificant या जगप्रसिद्ध गीताने साजरा करण्यात आला. १९६३ साली दर्शनी भागावरील काजळी स्वच्छ करण्यात आली पुढे १९९१ ते २००० सालापर्यंत डागडुजी करण्यात आली.

एतद्देशी मात्र जनतेची, सरकार आणि नोकरशाहीची ऐतिहासिक वास्तू जतन करण्यासाठी अशा प्रकारची आस्था आणि इच्छशक्ती दिसून येत नाही असे खेदाने म्हणावे लागेल. याला अपवाद एकच - तो म्हणजे रतन टाटा यांचा. २६/११ च्या दहशदवादी हल्ल्यात मुंबईच्या ऐतिहासिक ताज हॉटेलची शिसवी लाकडाची आणि अप्रतिम कलाकुसर असलेली Heritage wing ची अपरिमित हानी झाली होती. रतन टाटा यांनी सर्वप्रथम त्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कामगार आणि नोकरदारांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले आणि आर्थिक मदत केली. त्यानंतर काही महिन्यातच पुन्हा heritage wing चे गतवैभव परत आणले. दिवंगत रतन टाटा यांच्यावरून प्रेरणा घेऊन केंद्र सरकार, सगळी राज्य सरकारे, नोकरशाही आणि आपण समस्त जनतेनी आपला ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आस्था आणि कटाक्ष ठेवला तर आपणही आपल्या अनेक दिमाखदार आणि गौरवशाली वास्तुंचे गतवैभव परत आणू शकू .

